DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021




**मिसाईल मॅन**
माजी राष्ट्रपती ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९३व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

www.thanevaibhav.in/mr

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक । इष्ट ते छापणार । संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

**ख | ट्या | ळ | की**



**टोल**
कोणामुळे हलला पाळणा
प्रश्न तसा व्यर्थ आहे
कळा लागता निवडणुकीच्या
टोलमाफी त्याचा अर्थ आहे!
@ मिलिन्द

भारतीय सौर दिनांक आश्विन २३ शके १९४५ । वर्ष ५० । अंक ४९ । मंगळवार १५ ऑक्टोबर २०२४ । पाने ६ । रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ

## फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडिया

# औद्योगिक विकास आणि सामाजिक बांधिलकीत अग्रेसर

आपल्या गुणवत्तापूर्ण कामगिरीमुळेच ' एफ.आय. आय.' अर्थात 'फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडिया' ही संघटना गेली सहा दशके भारतीय औद्योगिक जगतात कॉर्पोरेट लिडरशीप आणि औद्योगिक प्रगतीचा मानदंड ठरली आहे. मोठ्या, मध्यम आणि लघु उद्योजकांचा एकत्रित शक्ती स्रोत म्हणून स्थापन झालेली 'एफ.आय. आय. ' ही संघटना आता 'अभिनव संकल्पना', 'समर्पण' आणि 'सामाजिक बांधिलकी' याचं मूर्तिमंत प्रतिक ठरली आहे. आपल्या साठ वर्षांच्या पथदर्शी प्रवासात 'एफ. आय. आय.'ने एक असं औद्योगिक वातावरण निर्माण केलं, ज्यामुळे उद्योगक्षेत्र-धोरण निर्माते आणि संपूर्ण समाज यांच्यात सौहार्दाचे संबंध प्रस्थापित झाले. संघटनेच्या माध्यमातून ज्येष्ठ कॉर्पोरेट लिडर्स, चैतन्यदायी व्यावसायिक यांचे एक जाळेच तयार झाले म्हणून ही किमया शक्य झाली.

देशाच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक प्रगतीसाठी उद्योग जगतातील सगळ्यांनी एकत्र येणे आवश्यक आहे हे ओळखून साठ वर्षांपूर्वी ' एफ. आय. आय'ची स्थापना झाली. त्यामुळेच शासकिय वर्तुळापासून ते आंतरराष्ट्रीय मंचापर्यंत सगळ्या ठिकाणी संघटनेच्या सभासदांचा आवाज, मागण्या, योजना पोहोचतील आणि त्यांची योग्य दखल घेतली जाईल याची खबरदारी संघटनेनं कायम घेतली आहे. संघटनेच्या ध्येयवादी, प्रामाणिक आणि समाजाभिमुख वाटचालीमुळेच एप्रिल २०१३ मध्ये 'एफ. आय. आय'चा सुवर्ण महोत्सव साजरा करताना प्रमुख पाहुणे म्हणून भारताचे ११ वे राष्ट्रपती, भारतरत्न माननीय डॉ. अब्दुल कलाम आवर्जून उपस्थित राहिले. या समारंभामुळे फेडरेशनचं देशाच्या सर्वांगिण प्रगतीत असलेलं महत्वाचं स्थान पुन्हा एकदा अधोरेखित झालं.

गेल्या पाच वर्षातील फेडरेशनची कामगिरी अतिशय लक्षणिय आणि पथदर्शी म्हणता येईल. 'इंटरनॅशनल बिझनेस डेव्हलपमेंट सेमिनार्स', 'इंटेलेक्च्युअल इंडस्ट्री मीट्स' अशा उपक्रमांमुळे फेडरेशनच्या कामाला नवी झळाळी मिळाली. या उपक्रमांमधून ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय मुत्सद्दी, बिझनेस लीडर्स, टेक्नॉलॉजी तज्ञ यांचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे ज्ञान-माहितीचे आदान-प्रदान झाले आणि बिझनेस नेटवर्किंग अधिक बळकट झाले. 'हॅनोव्हर मेसे', 'सी पी एच आय वर्ल्ड वाइड ', 'केम स्पेक युरोप ' अशा आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामवंत बिझनेस एक्सपोमध्ये फेडरेशनने सहभागी होऊन आपल्या सदस्यांना आंतरराष्ट्रीय मंचावर जाण्याचा मार्ग मोकळा केला. या सहभागामुळे जागतीक व्यापारात सामील होण्याचा आणि निर्णायक भूमिका बजावण्याचा अनुभव फेडरेशनच्या सदस्यांना मिळाला, ज्यामुळे त्यांच्या उद्योगाची अधिक प्रगती झाली.

फेडरेशनच्या या वाटचालीत आम्हाला भारतातील विज्ञान-तंत्रज्ञानातील महर्षी म्हणावेत अशा पद्मविभूषण प्रा. एम एम शर्मा, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि पद्मश्री प्रो. यादव यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभलं हे आमचं भाग्यच आहे. त्यामुळेच फेडरेशनच्या विकासाला योग्य गती मिळाली आणि प्रयत्नांना नेमकी दिशा मिळाली. जागतिक स्तरावर महासत्ता म्हणून भारताची वाटचाल होण्यासाठी याच दिग्गजांनी पहिली पावले उचलली आणि त्यामुळेच त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल फेडरेशन कायम ऋणी राहिल.

फेडरेशनची ठाणे-वागळे इस्टेट येथील वास्तू ही जणू फेडरेशनच्या समर्थ, सक्षम आणि अत्याधुनिक विचारसरणीचे साक्षात रुपच आहे. या तीन मजली वास्तूमध्ये सुविधांनी सुसज्ज असा कॉन्फरन्स हॉल, ट्रेनिंग सेंटर, कम्युनिकेशन हब आहे. फेडरेशनचे उपक्रम सुविहितपणे साजरे करण्याबरोबरच फेडरेशनच्या सभासदांना त्यांच्या व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी मदत करायला इथे सहायकांची टीम सज्ज असते.

व्यावसायिक-औद्योगिक प्रगती करतानाच 'एफ.आय.आय.'ने सुरवातीपासूनच समाजाप्रतीचे आपले कर्तव्य डोळसपणे बजावले आहे. आता सी एस आर हे कायद्याने बंधनकार ठरले आहे पण त्याआधीच फेडरेशनने 'सिटिझन एस्क्ट्रॉ ऑर्डिनरी अॅवॉर्ड'च्या माध्यमातून समाजासाठी वैशिष्ट्यपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना गौरवण्याची प्रथा पाडली आहे. अनाथांच्या माई सिंधुताई सपकाळ, वेगवेगळ्या देशातील गरजूंना अन्न उपलब्ध करुन देणारी संस्था 'रॉबिन हूड आर्मी', जेनेटिक औषधांचे संशोधन करणारा पी पी एम डी ट्रस्ट अशांचा गौरव करुन फेडरेशनने एक आदर्श निर्माण केला आहे.

२०२३ च्या फेब्रुवारीमध्ये फेडरेशनच्या वाटचालीत एक अनोखं पर्व सुरू झालं. फेडरेशनचे अध्यक्ष भालचंद्रसिंह रावराणे यांनी नेहरू आर्ट सेंटरमध्ये अपंग सैनिकांनी - जे व्हिलचेअरला जखडलेले आहेत - आपल्या तोंडात ब्रश धरुन काढलेली चित्रे पाहिली आणि या सैनिकांच्या विषयी त्यांचं मन अभिमानानं आणि गर्वानं भरुन आलं. त्यातूनच 'एफ. आय. आय. आणि पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर (पी आर सी) मध्ये स्नेहबंध निर्माण झाला. त्यामुळेच पी आर सी कडून आपल्या बहादूर जवानांच्या पुनर्वसनासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची दखल घेऊन या संस्थेला ' सिटिझन एस्क्ट्रॉ ऑर्डिनरी अॅवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम फेडरेशन हाउसमध्ये २९ मार्च २०२३ तर पुण्यात ९ एप्रिल २०२३ रोजी झाला.यावेळी पद्मविभूषण प्रो.शर्मा,पद्म विभूषण डॉ. माशेलकर, पद्मश्री प्रो. यादव असे मान्यवर आणि काही आंतरराष्ट्रीय पाहुणे उपस्थित होते.

'एफ.आय.आय.'च्या गेल्या सहा दशकांच्या सकारात्मक, उर्जामय आणि दैदिप्यमान वाटचालीमुळे भविष्यातील मार्गक्रमणाचा उत्साह वाढलेला आहे. उद्योग जगताला सर्वतोपरी सहाय्य करणारी संघटना म्हणून कार्य करतानाच जागतिक स्तरावर आपल्या उद्योगांची प्रतिमा, सहभाग आणि उत्पादन नेण्याचा प्रयत्न करणे हे जसे फेडरेशनचे ध्येय आहे, त्याचप्रमाणे सामाजिक बांधिलकी बजावण्यात कसूर होणार नाही याची दक्षता घेण्यातही फेडरेशन मागे नाही. शासन, सर्वसामान्य नागरिक आणि औद्योगिक जगत यांच्यातील दुवा म्हणून फेडरेशन काम करत आहे.भारतीय उद्योगविश्वाचा आवाज म्हणून आपली ओळख निर्माण करणाऱ्या फेडरेशनला जी समर्पणाची, प्रामाणिकपणाची,कर्तव्यनिष्ठेची परंपरा लाभली आहे ती तशीच पुढे नेण्याचा आमचा निर्धार आहे. फेडरेशनच्या आजवरच्या वाटचालीमुळे औद्योगिक विकास आणि सामाजिक जबाबदारी याचा समतोल साधण्याचा मापदंड निर्माण झाला आहे जो भविष्यातील उद्योजकांना, व्यावसायिकांना आणि समाजसेवी संस्थाना प्रेरित करत राहिल. सकारत्मक संघटन, अनोख्या संकल्पना आणि सामाजिय दाइत्व याचे उदाहरण म्हणून फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडिया ओळखले जाते आणि हीच ओळख भविष्यात आणखी ठळक करण्याचा आमचा निर्धार आहे.





भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्यासमवेत फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडियाचे अध्यक्ष भालचंद्रसिंह रावराणे

**फेडरेशनच्या आजवरच्या वाटचालीमुळे औद्योगिक विकास आणि सामाजिक जबाबदारी याचा समतोल साधण्याचा मापदंड निर्माण झाला आहे जो भविष्यातील उद्योजकांना, व्यावसायिकांना आणि समाजसेवी संस्थाना प्रेरित करत राहिल. सकारत्मक संघटन, अनोख्या संकल्पना आणि सामाजिय दाइत्व याचे उदाहरण म्हणून फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडिया ओळखले जाते आणि हीच ओळख भविष्यात आणखी ठळक करण्याचा आमचा निर्धार आहे.**



रायफलमॅन भोपाल सिंह (व्हीलचेअरमध्ये) यांचा सत्कार पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जनरल कॅहलॉन, श्री. रावराणे उपस्थित होते. भोपाल सिंह भारताच्या १९६२, १९६५, १९७१ साली झालेल्या तिन्ही युद्धात सहभागी झाले होते.


# FEDERATION HOUSE, WAGLE ESTATE, THANE






CHEMSPEC EUROPE -2023 BASEL,




HANNOVER MESSE 2023




CPHI BARCELONA 2023



CHEMSPEC EUROPE-2023 BASEL, SWITZERLAND

STATE OF ART CORPORATE AUDITORIUMS

fii@indofii.com  www.indofii.com

Ballrooms | Conference Halls | Meeting Rooms

Capacity ranging from 25 to 250 pax.

7708 50888

Federation House, Plot No., Road No. 16, Wagle Estate, Thane (W.)

# कल्याण - कर्जत महामार्गाच्या कॉंक्रिटीकरण कामाला सुरुवात

**उल्हासनगर :** शहरातील वाहतूक समस्या व शहर खड्डेमुक्त करण्याच्या उद्देशाने उल्हासनगर शहरातून जाणाऱ्या कल्याण - कर्जत महामार्गाच्या शांतीनगर ते साईबाबा मंदिरापर्यंतच्या रस्त्यावर भूमिगत गटार व कॉंक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी आमदार कुमार आयलानी, महानगरपालिका आयुक्त विकास ढाकणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता प्रशांत मानकर उपस्थित होते. हा एक महत्त्वाचा विकास प्रकल्प असून या माध्यमातून मजबूत कॉंक्रिटीकरण करून चांगला रस्ता, खड्ड्यांपासून मुक्ती, वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न आहे. या कामासाठी 68 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून (पीडब्ल्यूडी) हे काम करण्यात येत असल्याचे आ. कुमार आयलानी यांनी सांगितले. कल्याण -कर्जत महामार्गावर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. या दृष्टीने आम्ही भुयारी गटार बांधण्याच्या कामाला सुरुवात करणार असून यामुळे ही समस्या कायमची सुटणार आहे अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता प्रशांत मानकर यांनी दिली.

---

## फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(महाराष्ट्र शासकीय उपक्रम)

**विभागीय व्यवस्थापक कार्यालय :** बंगला क्र. ९ ए, बारा बंगला, कोपरी, ठाणे (पू) – ४००६०३ **दूरध्वनी क्र.** ०२२–२५३२९६८६,**Email :** dmfdcmthane@gmail.com

### जाहिरात सूचना

वन प्रकल्प विभाग,ठाणे अंतर्गत शिरसाड, कासा, मांडवी,गणेशपुरी व वाडा येथील डेपो व कॉलनी, नर्सरी मधील ईमारतीचे दुरूस्ती व नवीन बांधकाम करणेकामी त्याचे अंदाजपत्रके बनविणेकरीता इच्छुक सल्लागार किंवा वास्तुविशारद यांचे कडून दरपत्रके **दि.१४.१०.२०२४ ते दि. २९.१०.२०२४ दुपारी १.०० वाजेपर्यंत** मागविण्यात येत आहेत.

वरील विषयांकित माहीतीकरीता या कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/–
विभागीय व्यवस्थापक
वन प्रकल्प विभाग, ठाणे.

---

## CLASSIFIEDS ठाणेवैभव

### पाहिजेत

**ठाण्यातील प्रसिद्ध दैनिकात पेजिनेशनसाठी लेआउट आर्टिस्ट पाहिजे. Indesign, Photoshop, Coraldraw चे ज्ञान असणे आवश्यक. इच्छुकांनी biodata 8779802690 या नंबरवर व्हॉट्स ॲप करणे.**

### पाहिजेत

वेलनेस इंडस्ट्रीज मध्ये व्यवसायाची संधी घरातुन आपल्या वेळेनुसार काम करा. गुहिणी, नोकरदार, व्यापारी, स्टुडेंट
संपर्क –८९२८५६९९४३

---

### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की , अर्जदार श्री.पप्पु यादव, पत्ता- डी-५, सावित्री को.हौ.सो. आझाद नगर,कोलशेत रोड, ता.जि.ठाणे यांनी त्यांचा मुलगा कु.मोहित पप्पु यादव जन्माची नोंद ठाणे महानगर पालिका यांचे अभिलेखात केली नसल्याने कु.मोहित पप्पु यादव जन्माची नोंद करणेकामी ठाणे महानगरपालिका यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११.८.२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी(सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करुन जन्म मृत्यूच्या तारखेपासुन १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म -मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रीया संहिता , १९७३ कलम २३ (२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कु.मोहित पप्पु यादव यांचे जन्माची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारीत करणेकामी कोणाचे आक्षेप/ हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वतः अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

क्र. महसूल/कक्ष-१/ह.नोंद-१/टे-३/ कावि- ८२२६/२४
तहसीलदार कार्यालय,ठाणे
दिनांक : २०.९.२०२४

**(दिनेश पैठणकर)**
**निवासी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे**

---

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### निविदा सूचना क्र. ०२ (२०२४–२५)

**– मुदतवाढ –**

शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या २७ नागरी आरोग्य केंद्रा अंतर्गत १४ पदे आणि मुख्यालय प्रोग्राम मॅनेजमेंट युनिट अंतर्गत १ पद अशी एकूण १५ डेटा एन्ट्री ऑपरेटर–कम–अकाउंटंट ही रिक्त पदे तसेच अटेंडन्ट १९ पदे बाह्य संस्थेव्दारे उपलब्ध करून घेण्यासाठी ई– निवीदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा सादर करण्याची अंतिम दि. १४/१०/२०२४ रोजी दु.२.०० वा. पर्यंत होती.

परंतु, सदर निविदेस अल्प प्रतिसाद प्राप्त झाला असल्याने निविदेस दि. २१/१०/२०२४ रोजी दु. २.०० वा. पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. दि. २२/१०/२०२४ रोजी दु. ३.०० वा. पर्यंत निविदा उघडण्यात येईल.

**जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/१८२७**
**दि. १४/१०/२०२४**

**सही/–**
**प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे जाहीरपणे सुचीत करण्यात येते की, श्री. धिरजलाल रमेशलाल शर्मा व सौ. हर्षा धिरजलाल शर्मा हे मौजे पाले या हद्दीतील सर्व्हे नं. ५४/३ब व ३ड यावर बांधण्यात आलेला दिप्ती स्काय सिटी मधील सातपुरा नावाच्या इमारती मधील चौथ्या मजल्यावरील सदनिका क्र.४०२ चे मालक असुन सदर मिळकत माझे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घ्यावयाचे ठरविलेले आहे.

तरी सदरहू मिळकतीवर अगर त्या सदनिकेवर गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहीवाट, साठेकरार, लिज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधीतांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत आपल्या हरकती नोंदवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व करारनामा घेणेस योग्य आहे, असे समजून आमचे अशिल करारनाम्याचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून/ नंतर येणाया तक्रारी अगर हरकती माझे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत हे सर्व लोकांस कळावे.

**पत्ता:** ऑफिस २०४, दुसरा मजला, श्री यश को.ऑप.हौ.लि. रेल्वे स्टेशनच्या जवळ, संजीवनी हॉलच्या बाजुला, बदलापूर (पु). ता. अंबरनाथ जि. ठाणे

सही/-
**किरण क.धलपे**
(वकील)

---

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना सदरहू जाहीर नोटीसीने सूचीत करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जीचा उल्लेख यापुढे **सदरहू मिळकत** म्हणून करण्यात आला आहे ही बिना मोहनदास अडवानी यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीची होती.

सदरहू मिळकत चोख, निर्विवाद अशी असुन माझे अशिल **नरेंद्र मोहन अडवानी** यांची आई मयत कै. बिना मोहन अडवानी मृत्यु दिनांक ३०/०८/२२ व मयत कै.मोहनदास लक्ष्मणदास अडवानी मृत्यु दिनांक २२/१२/९५ यांच्या मृत्यु पश्चात कायदेशिर वारस म्हणुन **१. श्री. नरेंद्र मोहन अडवानी (मुलगा) २. कुमारी. गिता मोहन अडवानी (लग्नाआगोदरच नाव) सौ. रूचीका मनोज जिवनानी (लग्नानंतरचे नाव) (मुलगी)** आहे. दोघांचा हिस्सा ५० टक्के असून बहिन भावाला तीचा पुर्ण हक्क हक्कसोडपत्रांन्वये सोडण्यात येत आहे दिनांक ०७/१०/२०२४ रोजी हक्कसोडपत्र सह दुय्यम निबंधक उल्हासनगर-१ मध्ये दस्त क्रमांक ४५५२/२०२४ करण्यात आला आहे त्यानंतर **नरेंद्र मोहन अडवानी** यांचा पुर्ण हिस्सा सदरहु मिळकत मध्ये राहील.

यामुळे सदरहू मिळकतीचे स्वामित्व तपासण्यासाठी तसेच सदरहू मिळकत बोजेविरहीत असल्यासंबंधीची खातरजमा करण्यासाठी जाहीर नोटीस देण्याची विनंती मला माझ्या अशिलांनी केली आहे व माझ्या अशिलांनी सांगितलेवरुन सदरहू मिळकतीसंबंधी मी सदर खुलासेवार जाहीर नोटीस देत आहे. तरी सदरहू मिळकतीवर वा त्यांच्या भागावर गहाण दान, बक्षिस, फरोक्तखत, तारण, कुळवहिवाट, भाडेकरूपणाचे हक्क, विश्वस्त, वारसा, देखभाल, लीज, वहिवाट, पोटगी, साठेकरार, बयाणा वा तत्सम हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी व संबंधितांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे लेखी पुरावे व कागदपत्रासह स्वरुप विशद करून खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कुणाकडून काही लेखी हरकत, तक्रार व दावा न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजेविरहित आहे असे समजून माझे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागून आलेल्या तक्रारी, दावा व हरकती या रद्दबातल आहेत असे समजण्यात येतील.

**: मिळकतीचे परिशिष्ट :**

**तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण, मौजे उल्हासनगर कॅम्प क्र. ३ येथील सिटीएस नं. १२२३३, यु नं. २४४ पैकी शीट नं. २३, उ.नगर -३ या मिळकती वरील उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील तसेच मे. दुय्यम निबंधक साहेब उल्हासनगर कॅम्प क्र. ३ यांच्या अधिकार क्षेत्रातील शिव सागर अपार्टमेंट या नावे ओळखल्या जाणाऱ्या इमारती मधील सदनिका नं.२०२, दुसरा मजला, विंग-ए, क्षेत्र ८४२ चौ. फुट बांधीव हक्का सहित मिळकत.**

**पत्ता** :ए-११२, पहिला मजला, पटेल प्लाझा, स्टेट बँक जवळ, मुरबाड रोड, कल्याण (प)-जिल्हा ठाणे. ४२१३०१,

सही/-
**शेख जमीर हसन आर. अहमद**
(वकील)

---

### PUBLIC NOTICE

This is to inform general public that original share certificate no 0053 Distinctive Nos from 0261 to 0265 of have been lost/ misplaced.

The member of the society 1403/ Woodrose Co-Op Hsg Society Ltd, Hiranandani Medows, Gladys Alvaris Rd, off Pokhran Rd no 2, Thane West - 400610. applied for duplicate shares. The society hereby invites claims and objections for issuance of duplicate Share Certificate within the period of 14(fourteen) days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/ their claims/objections for issuance of duplicate Share Certificate to the secretary of Woodrose co op hsg society ltd. If not claims/objections are received within the period prescribed above the society shall be free to issue duplicate Share Certificate in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/objections, if any, received by the society shall be dealt within the manner provided under the by-laws of the society.

**For and on behalf of Woodrose Co-Op Hsg society.**

---

### FORM N.D.
### [See rule 92(3)]
### Form of Notice to be published in Newspaper by the successor to the Permit holder.

It is hereby informed for the knowledge of public that Shri. **KUSUM KANODIA** owner of the Motor Vehicle No. MH-04-CM-4533 covered by permit No. has expired on 11 /09/2023.

I Shri. **RAJESH RAMAUTAR KANODIA** address: Flat No. 404, Tower 2, Siddhachal CHS Phase 6, Thane West - 400607. being the successor to the abovementioned to confer intend to use the permit and accordingly, I have applied to the appropriate authority/Regional Transport Office/Regional Transport Authority for the transfer of permit in my name.

Any person having any claim or objection in this regard, should within 15 days from the publication of this Notice, being such fact to the notice of Regional Transport Office/ Regional Transport Authority Thane.

**Sd/-**
**Shri. RAJESH RAMAUTAR KANODIA**
Address:- Flat No. 404, Tower 2, Siddhachal CHS, Phase 6, Thane West - 400607.

---

### PUBLIC NOTICE
**IN THE COURT OF CIVIL JUDGE (S. D.) THANE AT THANE**
**Before Hon'ble C.J. (S.D.) Thane Smt. P.D. More**
**SPECIAL DARKHAST No. 18/2024 Exh-8**
**N.D. 26/11/24**

**Neelam Dashrath Singh ........D. H.**
**V/s.**
**M/s. Asiatic Gases Ltd. .......J. D.**

WHEREAS the above named Decree Holder has filed Special Darkhast to direct the concerned office bearer to release the Decreetal Amount deposited with the said office. In the said Darkhast you the Judgement Debtor i.e. M/s. Asiatic Gases Ltd., is hereby summoned to appear in this Court, in person or by Pleader or any other person duly authorized in writing and able to answer all material questions relating to the said Darkhast on 26th November 2024 at 11.00 a.m. before noon.

Take notice that in default of your appearance on the day mentioned above, the said Darkhast will be heard and determined in your absence. Given under my hand and the seal of this Court, this 11 Day of October 2024.

court seal

**by Order**
**Sd/-**
Asst. Superintendent
**Civil Judge S. D. Thane**

---

### -: जाहीर नोटीस :--

मी श्री संजय कुमार सिंग आज dt 12/10/2024असे जाहीर करते की माझ्या मालकीची सदनिका क्र एस एस/1(A),F-21, sector no.04, AIROLI, नवी मुंबई 400708. हीचे सिडको नी दिलेले ओरिजनल allotment letter dt,05/3/1987 व दस्त क्रं 1520 ची पावती दि. 13/8/1999 रोजीचे Airoli परिसरात dt 10/09/2024 रोजी AIROLI परिसरात हरवले आहे. तरी तशी मी रबाळे पोलिस स्टेशनमध्ये प्रॉपर्टी मिशिंग तक्रार केली आहे. प्रॉपर्टी मिसिंग no.2589/2024. दि.10/10/2024. असा आहे. तरी कोणास सापडल्यास वरील पत्यावर किंवा मो.न. वर संपर्क साधावा.

**सही करणार**
**श्री. संजय कुमार सिंग ( मो.न.9819714710)**

---

### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्री. शांताराम देहु पावशे,पत्ता- बामल्ली हनुमान मंदिराजवळ, वाकळण, ता. जि. ठाणे यांनी त्यांची चुलत काका कै. तुकाराम नामा पावशे यांच्या मृत्युची नोंद नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांचे अभिलेखात केली नसल्याने कै. तुकाराम नामा पावशे यांच्या मृत्युची नोंद करणेकामी नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करून जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करून आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २३ (२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कै. महादी आ. नामा पावशे यांचे मृत्युची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारित करणेकामी कोणाचे आक्षेप/हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वत: अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर राहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र. महसूल/कक्ष-१/ह.नोंद-१/टे-३/कावि-२५६२१५४/२४
तहसीलदार कार्यालय, ठाणे
दिनांक ०७/१०/२०२४

शिक्का

सही/-
**(दत्तात्रय बेर्डे)**
नायब तहसीलदार (संगांयो) तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे

---

### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्री. शांताराम देहु पावशे,पत्ता- बामल्ली हनुमान मंदिराजवळ, वाकळण, ता. जि. ठाणे यांनी त्यांचे त्यांचे चुलत आजोबा कै. नामा रावजी पावशे यांच्या मृत्युची नोंद नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांचे अभिलेखात केली नसल्याने कै. नामा रावजी पावशे यांच्या मृत्युची नोंद करणेकामी नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करून जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करून आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २३ (२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कै. महादी आ. नामा पावशे यांचे मृत्युची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारित करणेकामी कोणाचे आक्षेप/हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वत: अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर राहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र. महसूल/कक्ष-१/ह.नोंद-१/टे-३/कावि-२५६२१३६/२४
तहसीलदार कार्यालय, ठाणे
दिनांक ०७/१०/२०२४

शिक्का

सही/-
**(दत्तात्रय बेर्डे)**
नायब तहसीलदार (संगांयो) तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे

---

### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्री. शांताराम देहु पावशे,पत्ता- बामल्ली हनुमान मंदिराजवळ, वाकळण, ता. जि. ठाणे यांनी त्यांचे आजोबा कै. लक्ष्मण रावजी पावशे यांच्या मृत्युची नोंद नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांचे अभिलेखात केली नसल्याने कै. लक्ष्मण रावजी पावशे यांच्या मृत्युची नोंद करणेकामी नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करून जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करून आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २३ (२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कै. महादी आ. नामा पावशे यांचे मृत्युची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारित करणेकामी कोणाचे आक्षेप/हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वत: अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर राहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र. महसूल/कक्ष-१/ह.नोंद-१/टे-३/कावि-२५६२१४८/२४
तहसीलदार कार्यालय, ठाणे
दिनांक ०७/१०/२०२४

शिक्का

सही/-
**(दत्तात्रय बेर्डे)**
नायब तहसीलदार (संगांयो) तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे

---

### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्री. शांताराम देहु पावशे, पत्ता- बामल्ली हनुमान मंदिराजवळ, वाकळण, ता. जि. ठाणे यांनी त्यांचे त्यांचे चुलती कै. मनुबाई लक्ष्मण पावशे यांच्या मृत्युची नोंद नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांचे अभिलेखात केली नसल्याने कै. मनुबाई लक्ष्मण पावशे यांच्या मृत्युची नोंद करणेकामी नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करून जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करून आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २३ (२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कै. महादी आ. नामा पावशे यांचे मृत्युची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारित करणेकामी कोणाचे आक्षेप/हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वत: अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर राहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र. महसूल/कक्ष-१/ह.नोंद-१/टे-३/कावि-२५६२१४५/२४
तहसीलदार कार्यालय, ठाणे
दिनांक ०७/१०/२०२४

शिक्का

सही/-
**(दत्तात्रय बेर्डे)**
नायब तहसीलदार (संगांयो) तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे

---

### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्री. शांताराम देहु पावशे, पत्ता- बामल्ली हनुमान मंदिराजवळ, वाकळण, ता. जि. ठाणे यांनी त्यांचे वडिल कै. देहु लक्ष्मण पावशे यांच्या मृत्युची नोंद नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांचे अभिलेखात केली नसल्याने कै. देहु लक्ष्मण पावशे यांच्या मृत्युची नोंद करणेकामी नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करून जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करून आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २३ (२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कै. महादी आ. नामा पावशे यांचे मृत्युची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारित करणेकामी कोणाचे आक्षेप/हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वत: अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर राहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र. महसूल/कक्ष-१/ह.नोंद-१/टे-३/कावि-२५६२१५४/२४
तहसीलदार कार्यालय, ठाणे
दिनांक ०७/१०/२०२४

शिक्का

सही/-
**(दत्तात्रय बेर्डे)**
नायब तहसीलदार (संगांयो) तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे

---

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय
व्दितीय मुदतवाढ निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील प्राध्यापक व पदव्यूत्तर पदवी आणि पदवी वैद्यकिय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकिय पुस्तके खरेदी करणेसाठीऑन लाईन ई- टेंडरिंग पध्दतीने ठामपा/पिआरओ/अधिष्ठाता/६७० दि:०४/१०/ २०२४ अन्वये प्रथम मुदतवाढ निविदा मागविण्यात आली होती. एकूण निविदा प्राप्त झालेल्या आहेत. अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे व्दितीय मुदतवाढ देण्यात येत आहे. व्दितीय मुदतवाढ निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in. दि:१४/१०/२०२४ ते दि: २२/१०/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि.२२/१०/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत ऑनलाईन निविदा स्विकारणेत येतील दि.२५/१०/ २०२४ रोजी १६.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑन लाईन उघडण्यात येतील. ठाणे महानगरपालिकेला सर्व किंवा कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा किंवा स्विकारणेचा संपूर्ण अधिकार आहे.

ठामपा /पिआरओ/अधिष्ठाता/७९२/२०२४-२५ सही/-
दि.११.१०.२०२४ प्र.अधिष्ठाता
**plsvisitourofficialweb-site** छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व
**www.thanecity.gov.in** राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय

---

### जाहीर नोटीस

**सर्व संबंधितांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, माझे पक्षकार हे खालील परिशिष्ठात वर्णन केलेली सदरहू मिळकतीचे विकसनाचे हक्क - अधिकार हे जमिनीचे मालक अमीर नवाब मुल्ला यांचे वारस हबिबाबी अब्दुल रज्जाक ढोले व इतर यांचेकडून घेण्याबाबत निश्चिती केलेली आहे.**

**तरी सदरहू मिळकतींवर वा तीचे भागावर मालकी हक्क, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, वहिवाट, कुळ, भाडेकरुपणाचे हक्क, विश्वस्त वारसा, देखभाल, लीज, कुळवहिवाट, लिव्ह अँड लायसेंस, पोटगी, साठेकरार, बयाणा वा तत्सम कोणताही दावा, मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या वा तसा दावा करणाऱ्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आंत आपले हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन खाली सही करणार यांचे ऑफीसात लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार वा दावा न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध व बोजेविरहीत आहे, असे समजून योग्य ते दस्तावेज करण्यात येतील व मागाहून आलेल्या तक्रारी व दावे वा हरकती या रद्दबादल आहेत व सोडून देण्यात आल्या आहेत, असे समजण्यात येईल.**

**: सदरहू मिळकतीचे वर्णन :**

**मौजे डावले, तलाठी सजा शिळ, तालुका व जिल्हा ठाणे, रजिस्ट्रेशन डिस्ट्रीक्ट व सब्-डिस्ट्रीक्ट ठाणे आणि ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत:-**

| सर्वे क्र. | हिस्सा क्र. | जमिनीचा प्रकार | क्षेत्र हे-आर-प्रती | आकार |
|---|---|---|---|---|
| १२५ | ४ | खराब | ०-२०-२० | ०३-६२ |
| | | पोट-खराब | ०-०४-३० | |
| एकूण | | | ०-२४-५० | |

**वर नमूद २४५० चौ.मी. (२४.५० गुंठे) या संपूर्ण मिळकतीतून दर्गा-शरीफ यामध्ये संपादित झालेले २८० चौ. मी. क्षेत्र वगळून उर्वरित अंदाजे सुमारे २१७० चौ. मी. क्षेत्राचे विकसनाचे अधिकार.**

**दिनांक : १५ ऑक्टोबर २०२४.**

**पत्ता : १०१-१०२, शरणम रेसिडेंसी, बाळ गणपती मंदिर समोर, एदलजी रोड, चरई, ठाणे.**
**दुरध्वनी : ९८२०८३१४४४**

**सही/-**
**(एन. आर. महाजन)**
**वकील**

---

### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्री. शांताराम देहु पावशे,पत्ता- बामल्ली हनुमान मंदिराजवळ, वाकळण, ता. जि. ठाणे यांनी त्यांची चुलत आजी कै. महादी आ. नामा पावशे यांच्या मृत्युची नोंद नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांचे अभिलेखात केली नसल्याने कै. महादी आ. नामा पावशे हिच्या मृत्युची नोंद करणेकामी नवी मुंबई महानगरपालिका/ग्रुप ग्रामपंचायत वाकळण यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करून जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करून आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २३ (२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कै. महादी आ. नामा पावशे यांचे मृत्युची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारित करणेकामी कोणाचे आक्षेप/हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वत: अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर राहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र.महसूल/कक्ष-१/ह.नोंद-१/टे-३/कावि-२५६२११९/२४
तहसीलदार कार्यालय, ठाणे
दिनांक ०७/१०/२०२४

शिक्का

सही/-
**(दत्तात्रय बेर्डे)**
नायब तहसीलदार (संगांयो) तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे

---

### NOTICE

[Under the Bye-law No. 35]
(The Form of Notice Inviting Claims or Objections to Issue Duplicate Share Certificate and the Interest of the Members in the Capital / Property of the Society.)

**MR. VINAYKANT PRABHULAL THAKKAR** member of the KASHIMA Co-operative Housing Society Limited, having address at Flat No. 14, Kashima CHSL, Opp. Damani Estate, LBS Marg, Naupada, Thane West 400602 and having Share Certificate No. 7 with distinctive Nos. From 31 to 35 have lost the Share Certificate.

The Society hereby invites claims or objection from the heirs or other claimants/ objectors to the said Share and the interest of the member in the capital / property of the Society within a period of 15 days from this Notice. If No claim/objection is received within the period prescribed above the Society shall be free to deal with the Member to issue the DUPLICATE SHARE CERTIFICATE as per the Member's request.

Thane
Dated : 14/10/2024

**Sd/-**
**For and on behalf of KASHIMA Co-operative Housing Society Ltd.**

**Chairman Secretary Treasurer**

---

### NOTICE

[Under the Bye-law No. 35]
(The Form of Notice Inviting Claims or Objections to Issue Duplicate Share Certificate and the Interest of the Members in the Capital / Property of the Society.)

**MR. MAHENDRA PRABHULAL THAKKAR** member of the KASHIMA Co-operative Housing Society Limited, having address at Flat No. 15, Kashima CHSL, Opp. Damani Estate, LBS Marg, Naupada, Thane West 400602 and having Share Certificate No. 12 with distinctive Nos. From 56 to 60 have lost the Share Certificate.

The Society hereby invites claims or objection from the heirs or other claimants/ objectors to the said Share and the interest of the member in the capital / property of the Society within a period of 15 days from this Notice. If No claim/objection is received within the period prescribed above the Society shall be free to deal with the Member to issue the DUPLICATE SHARE CERTIFICATE as per the Member's request.

Thane
Dated : 14/10/2024

**Sd/-**
**For and on behalf of KASHIMA Co-operative Housing Society Ltd.**

**Chairman Secretary Treasurer**

---

### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर आवाहन करण्यांत येते की **श्री. मंदार संदिप उमरोठकर**, रा. भालेराव बिल्डिंग, महात्मा फुले रोड, महात्मा गांधी विद्या मंदिर जवळ, डोंबिवली ता. कल्याण जि.ठाणे यांनी या कार्यालयास **त्यांचे वडील कै. संदिप मच्छिद्रनाथ उमरोठकर हे** मयत झाले असून त्यांच्या वारसांना **वारस चौकशी करुन मिळणेबाबत** विनंती अर्ज केला आहे.

सदर अर्जाचे अनुषंगाने तलाठी सजा ठाकूर्ली यांचेमार्फत वारसांची चौकशी करुन वारस पंचनामा सादर केला असून पंचनाम्याचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे वारस असल्याचे निदर्शनास येतात.

**वारसांचा तपशिल**

| अ.क्र. | नांव | वय (वर्षे) | मयत व्यक्तीशी नाते |
|---|---|---|---|
| १ | सुप्रिया संदिप उमरोठकर | ५९ | पत्नी |
| २ | मंदार संदिप उमरोठकर | ३७ | मुलगा |
| ३ | स्नेहा संजय दांडेकर | ३६ | मुलगी |

तलाठी सजा ठाकूर्ली यांचेकडील अहवालानुसार उक्त नमूद केलेप्रमाणे वारस असल्याचे दिसून येतात. तरी याबाबत कोणाचे हक्क, आक्षेप असल्यास किंवा कोणाचे हक्क प्रस्थापित होत असल्यास आवश्यक त्या पुराव्यासह **तहसिलदार कार्यालय, कल्याण** येथे सदर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ७ दिवसांच्या आत उपस्थित रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांचे आधारे पुढील निर्णय घेण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**क्र. महसुल/कक्ष–१/टे–१०/हक्कनोंद/वारसनोंद/कावि–१७०५/२०२३**
**दिनांक :– १४/१०/२०२४**

**सही/–**
**(जयराम देशमुख)**
**तहसिलदार कल्याण**

---

### PUBLIC NOTICE
**IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) AT THANE**
**Before Hon'ble C.J. (S.D.) Thane Smt. P.D. More**
**Spl. Civil Suit No. 119/2024 Exh-18**
**N.D. 21/11/124**

**Mr. Arun Kumar Jain ........Plaintiff**
**VERSUS**
**1. Mr. Deepak Chandulal Raval**
**2. Mr. Ryan Maxim Mathias**
**3. M/s. Myriad Hospitalities & Banquets LLP**
**4. Aditya Hospitality .......Defendants**

WHEREAS the above named Plaintiff has filed Suit for Declaration, Injunction, Accounts, Recovery & Damages against the Defendants mentioned therein. In the said suit Defendant No. 3 M/s. Myriad Hospitalities & Banquets LLP, is hereby summoned to appear in this Court, in person or by Pleader or any other person duly authorized in writing and able to answer all material questions relating to the suit or who shall be accompanied by some other person able to answer all such question on 21st November 2024 at 11.00 a.m. before noon.

Take notice that in default of your appearance on the day mentioned above, the suit will be heard and determined in your absence. Given under my hand and the seal of this Court, this 11th Day of October 2024

court seal

**by Order**
**Sd/-**
Asst. Superintendent
**Civil Judge S. D. Thane**

DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

thanevaibhav | Thane Vaibhav | Thane Vaibhav | thanevaibhav

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

www.thanevaibhav.in/mr

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक । इष्ट ते छापणार । संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

भारतीय सौर दिनांक आश्विन २३ शके १९४५ । वर्ष ५० । अंक ४९ । मंगळवार १५ ऑक्टोबर २०२४ । पाने ६ । रु. ४ | संपादक : मिलिन्द बल्लाळ

# जुना विकास आराखडा दमला; ठामपाने नवीन आराखडा मांडला!

- २० वर्षांत आराखड्याची केवळ ६० टक्के अंमलबजावणी
- नवीन आराखड्यानुसार आरक्षित भूखंडांचे सर्वेक्षण अणि विकास



**ठाणे:** गेल्या 20 वर्षांत जुन्या विकास आराखड्याची अंमलबजावणी केवळ 60 टक्केच झाली असताना ठाणे महापालिकेने नवीन विकास आराखडा सादर केल्याची माहिती मिळत आहे.

मुंबई, नागपूरनंतर 'ब' श्रेणीत मोडणाऱ्या ठाणे महापालिकेच्या जुन्या विकास आराखड्याला 2003 साली मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर 20 वर्षांनी नव्या विकास आराखड्याचे काम सुरु करण्यात आले होते. 2003 नंतर शहरात मोठ्या प्रमाणात शहरीकरण तसेच अतिक्रमणे झाली आहेत. अनेक आरक्षित भूखंडांवर अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे विकास आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संपूर्ण शहराचाच ग्राउंड सर्व्हे करण्यात आला होता. सध्या शहरात विविध प्रकारची विकासकामे सुरु आहेत. त्याचबरोबर स्मार्ट सिटी अंतर्गत काही प्रकल्पांची कामे देखील सुरु आहेत. जी आरक्षणे बाधित झाली आहेत, त्या आरक्षित क्षेत्राचा आणि बाधित क्षेत्राचा सर्व्हे करून संपूर्ण तपशील तयार करण्यात आला आहे. टीडीआर मंजूर करण्यासाठी सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 च्या कलम 127 आणि 48 नुसार शहरातील ज्या जागा संपादित करायच्या आहेत त्या आरक्षित जागांचे सर्व्हेक्षण करून त्या जागांचे नकाशे तसेच डॉक्युमेंट या विकास आराखड्यात तयार करण्यात आले आहे.

जुन्या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीवर प्रकाश टाकल्यानंतर वापरात आलेल्या जमीनी लक्षात घेऊन त्यादृष्टीने

**20 टक्केच आरक्षित भूखंडाचा वापर**

**गेल्या 20 वर्षांत विकास आराखड्यातील एकूण 404 आरक्षित भुखंडांपैकी केवळ 67 भुखंडच विकसित झाले आहेत. बहुतांश आरक्षित भूखंडावर अतिक्रमण झाल्याने आरक्षित भूखंड विकसित करण्याचे मोठे आव्हान पालिकेसमोर आहे.**

➤पान ४ वर

# अखेर हलक्या वाहनांना मुंबई प्रवेश टोल फ्री

## वाहतूक कोंडी, इंधनाचा अपव्यय आणि आर्थिक भुर्दंड टळणार | ठाणे-नवी मुंबईतील लाखो वाहन चालकांना दिलासा

**ठाणे: महायुती सरकारने सर्वसामान्य वाहन चालकांना दिलासा देणारा मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईत प्रवेश करण्यासाठी असलेल्या मार्गांवरील पाचही टोल नाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण टोल माफी देण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंदर्भात मोठी घोषणा करण्यात आली. आज रात्री बारा वाजल्यापासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे.**

➤पान ४ वर







ठाण्यात भाजपा, शिवसेना आणि मनसेने जल्लोष करत पेढे वाटून आनंद व्यक्त केला.



# अभिनेते अतुल परचुरे काळाच्या पडद्याआड

**ठाणे:** मराठी रंगभूमीवर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हरहुन्नरी कलाकार अतुल परचुरे यांनी वयाच्या 57 व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने मराठी सिनेविश्वार शोककळा पसरली आहे.

मागील अनेक दिवसांपासून ते कर्करोगाशी झुंजत होते. इतकेच नव्हे तर त्यांनी कर्करोगावर मात करत रंगभूमीवरचा अंक सुरुच ठेवला होता. त्यांच्या या नव्या अंकाचं अनेकांनी भरभरुन कौतुक केलं होतं. इतकच नव्हे तर त्यांनी नुकतेच सुर्याची पिल्ले या नाटकाचीही घोषणा केली होती. त्यामुळे अतुल परचुरे हे रंगभूमीवरुन पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासही सज्ज झाले होते.

नाटक, सिनेमा आणि मालिका अशा तिन्ही माध्यमांवर अतुल परचुरे यांनी त्यांच्या अभिनयाची छाप सोडली होती.

# ठाणे महापालिकेला कचरा टाकण्यासाठी जागा सापडेना

**ठाणे:** ठाणे पालिका क्षेत्रामध्ये दररोज एक हजार मेट्रीक टन इतका कचरा जमा होतो. हजारो कोटींचे बजेट असणाऱ्या पालिकेला अजूनही स्वताचे हक्काचे डंपिंग ग्राऊंड नाही. आजही कचरा टाकण्यासाठी जागा मिळत नसल्याने शहरात कचऱ्याचे ढीग दिसत आहेत.

दिवा येथील ज्या क्षेपणभूमीवर कचरा टाकला जात होता. तो राजकीय वचनपूर्तीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यात डायघर येथील कचरा विल्हेवाटीचा प्रकल्प डबक्यात पडला आणि ठाणेकरांचा कचरा टाकायचा कुठे असा प्रश्न निर्माण झाला आहे.



यावर उतारा म्हणून सीपी तलाव येथील हस्तांतरण केंद्रामध्ये गेल्या काही महिन्यांपासून संपूर्ण शहराचा कचरा टाकला जात होता. पण त्याची क्षमताही संपली असून परिसरातील रहिवाशांचा विरोध वाढला आहे. सीपी तलाव येथील कचरा भिवंडीत हलवण्याचा प्रयत्नही पालिकेने केला. पण त्याला अद्याप यश आलेले नाही.

सी. पी. तलावात घंटागाड्यांना प्रवेश देण्यास रहिवाशांनी विरोध केला आहे. त्यामुळे ठाण्यातून सकाळ-संध्याकाळ कचरा संकलन करणारे घंटागाड्या जागेवर आहेत. मिळालेल्या माहितीनुसार जोपर्यंत ही समस्या सुटत नाही, तोपर्यंत आलटून पालटून रहिवासी संकुलातील कचरा उचलण्याच्या तोंडी सुचना स्थानिक ठेकेदारांना देण्यात आले आहेत. त्यामुळे शहरातील शेकडो रहिवासी संकूलातील कचरा गेल्या काही दिवसांपासून उचलला जात नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

# उल्हासनगर महापालिका कर्मचाऱ्यांना १७ हजार रुपये बोनस

**उल्हासनगर:** उल्हासनगर महापालिकेतर्फे सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्गाला यंदा 17 हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान अर्थातच बोनस जाहीर करण्यात आला आहे. यामुळे सर्व कामगार व कर्मचारी यांची दिवाळी गोड होणार आहे.

उल्हासनगर पालिकेत सुमारे अडीच हजार कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांना दरवर्षी दिवाळी निमित्त बोनस म्हणजे सानुग्रह अनुदान दिले जाते. आज मनपा आयुक्त विकास ढाकणे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व कामगार संघटनेच्या पदाधिका-यांची बैठक झाली. या बैठकीत सर्वानुमते 17 हजार रुपयांचे सामुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले.

➤पान ४ वर




**वावीकर आय इन्स्टिट्युट येथे आधुनिक लासिक तंत्रज्ञान वेवलाईट प्लसचे उद्घाटन राज्यसभेचे माजी खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या हस्ते दसऱ्याच्या मुहूर्तावर पार पडले. यावेळी डॉ. चंद्रशेखर आणि डॉ. वैशाली वावीकर यांनी या तंत्रज्ञानामुळे लोकांना कसा फायदा होईल याची माहिती दिली. 'ठाणेवैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ हे देखील यावेळी उपस्थित होते. भारतात पहिल्यांदाच हे तंत्रज्ञान आले असून ते ठाण्यात वावीकर आय इन्स्टिट्युतमध्ये आल्यामुळे ठाणेकरांनी आनंद व्यक्त केला.**

## बसचे वेळापत्रक मिळणार, सुट्ट्या पैशावरून होणारे वादही टाळणार

# 'माझी टीएमटी' मोबाईल ॲपद्वारे प्रवाशांना मिळणार तिकीट

**ठाणे:** ठाणे परिवहन सेवेच्या प्रवाशांना विविध सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या 'माझी टीएमटी' (Mazi TMT) या मोबाईल ॲपचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नुकतेच लोकार्पण करण्यात आले. या ॲपमुळे प्रवाशांना यूपीआयद्वारे डिजिटल तिकिट काढण्याची सुविधा मिळणार आहे. सध्या ही सुविधा काही बसमार्गावर सुरु करण्यात आली आहे. ती टप्प्याटप्प्याने टीएमटीच्या सर्व बसमार्गांवर प्रवाशांना वापरता येणार आहे.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (11 ऑक्टोबर 2024) धर्मवीर आनंद दिघे वाचनालय आणि अभ्यासिकेचे लोकार्पण केले. त्याच ठिकाणी ठाणे महापालिका परिवहन सेवेच्या 'माझी टीएमटी' (Mazi TMT) या मोबाईल ॲपचेही लोकार्पण करण्यात आले. या मोबाईल ॲपद्वारे तिकिट काढण्याची पद्धत, बसमधील वाहकाकडून त्याचे केले जाणारे व्हेरिफिकेशन याचा डेमो याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी पाहिला. प्रवाशांसाठी ही चांगली सुविधा असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी केले. यावेळी, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक,

➤पान ४ वर

**या मोबाईल ॲपद्वारे प्रवाशांना यूपीआय वापरुन डिजिटल तिकिट काढता येईल. तसेच, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंगचा वापर करून पैसे भरता येतील. त्याचप्रमाणे, प्रवाशांना बस कोठे आणि किती वेळेत स्टॉपवर येणार याची माहिती देण्याची सुविधाही या ॲपमध्ये आहे. प्रवाशांना ॲपवर प्रवासाच्या सुरुवातीचे ठिकाण आणि गंतव्य स्थान यांची माहिती भरुन बसमार्ग, त्या मार्गावरील उपलब्ध बसगाड्या, त्यासाठी लागणारे तिकिट भाडे याचीही माहिती मिळणार आहे.**



# महाराष्ट्रातील भाविकांसाठी अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन

## सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा



**ठाणे:** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन बांधण्याची घोषणा केली होती. त्यानंतर अयोध्येत राम जन्मभूमी मंदिर परिसरात महाराष्ट्र भक्त सदन उभारण्यासाठी राज्य शासनाने जूनमध्ये जमीनही खरेदी केली होती. या जागेवर पर्यावरणपूरक हरित इमारत बांधण्यात येणार असून इमारत बांधणीचे भूमिपूजन नुकतेच महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण व उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

याबाबत अधिक माहिती देताना मंत्री रविंद्र चव्हाण म्हणाले की जवळपास 9500 चौरस मीटर क्षेत्रफळावर 12 मजली भव्य महाराष्ट्र भक्त सदन उभे राहणार असून त्या ठिकाणी 650 पर्यटक राहू शकतील, असे भव्य भक्त निवास साकारणार आहे. भक्त निवासात एकूण चार व्हीआयपी कक्ष, 96 खोल्या असून 40 डॉर्मिटरी बांधण्यात येणार आहेत. पुढील तीन वर्षात हे महाराष्ट्र भक्त सदन बांधून पूर्ण करण्यात येणार आहे. हे भक्त सदन अयोध्येतील महत्वाच्या सर्व स्थळांपासून जवळ आहे. महर्षी वाल्मिकी विमानतळ पासून 11.5 किमी, श्रीराम जन्मभूमी मंदिर पासून 7.5 किमी तर अयोध्या रेल्वे जंक्शनपासून 4.5 किमी अंतरावर आहे. श्रीरामाचे आणि महाराष्ट्राचे पौराणिक नाते असून श्रीरामाला गोदातीरे पाहिल्यावर शरयू नदी तटाची आठवण झाली. त्यानुसार महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश यांच्यात धार्मिक आणि सांस्कृतिक नाळ जुळली. रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र हे समस्त भारतीयांसाठी धार्मिक आणि भावनिक असून महाराष्ट्रातील शेकडो स्वयंसेवक आणि कारसेवक यांनी त्यासाठी प्रखर संघर्ष केला. श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाल्यावर महाराष्ट्रातील भाविकांसाठी जून महिन्यात अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन बांधण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून उभारण्यात येणारे हे महाराष्ट्र भक्त सदन म्हणजे याच भावनिक नात्याचे पुढचे पाऊल आहे, असे मंत्री रविंद्र चव्हाण यांनी यावेळी म्हणाले.

दरम्यान, या भूमिपूजन सोहळ्यासाठी उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य, अयोध्या हनुमान गढीचे महंत राजू दासजी महाराज, अयोध्येचे आमदार वेदप्रकाश गुप्ता, महापौर गिरीशपती त्रिपाठी, सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सचिव (रस्ते) सदाशिव साळुंखे, सचिव (इमारती) संजय दशपुते, मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे, अधीक्षक अभियंता विवेक बडे, मुख्य अभियंता रणजित हांडे, अधीक्षक अभियंता प्रमोद बनगोसावी आदी उपस्थित होते.

## ह्युंदई मोटारचा २७ हजार कोटींचा आयपीओ बाजारात

**ठाणे:** ह्युंदई मोटर्स इंडिया लि.चा भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा म्हणजे 27,856 कोटी रुपयांचा आयपीओ 15 ते 17 ऑक्टोबर दरम्यान गुंतवणूकीसाठी बाजारात येत आहे. या आयपीओसाठी 1865 ते 1960 एवढा किमत पट्टा जाहीर करण्यात आला आहे. या इश्युसाठी किमान सात शेअरसाठी व त्यापुढे सात शेअरच्या पटीत अर्ज करावा लागेल. या शेअरचे दर्शनी मूल्य 10 रुपये आहे. हा आयपीओ 2024 मधील जगातील सर्वात मोठा आयपीओ असल्याचे सांगितले जात आहे. ह्युंदई मोटर इंडिया लि.चे अध्यक्ष व एमडी ऊन सू किम यांनी ही माहिती दिली आहे. कंपनीने आतापर्यंत 13 प्रकारच्या एकूण सव्वा कोटींच्या आसपास मोटारींची निर्मिती केली आहे. भारतातील मोटर उत्पादकांमध्ये त्यांचा दुसरा क्रमांक आहे. त्यांचा भारतातील महसूल 698 अब्ज रुपये असून आतापर्यंत 36 लाख गाड्या निर्यात केल्या आहेत. त्यांचा भारतात सुमारे तीन हजार दुकाने असून त्यांची वार्षिक उत्पादन क्षमता सव्वा आठ लाखाच्या आसपास आहे. सेंट्रो, व्हर्णा, आय ट्वेंटी क्रेटा, ब्लूलिंक,आयोनिक या त्यांच्या मोटरी पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीवर चालतात.

# उपांत्य फेरीत कोण करणार जागा पक्की? इंग्लंड की वेस्ट इंडिज की दोघेही?




आयसीसी महिला टी-२० विश्वचषकाच्या या आवृत्तीतील शेवटचा साखळी सामना मंगळवारी दुबईत इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात खेळवला जाणार आहे. ब गटातील या दोन संघांना उपांत्य फेरीत प्रवेश करण्याची संधी आहे. तथापि, उपांत्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी स्पर्धा करणारा तिसरा संघ दक्षिण आफ्रिका आहे. इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेचे सहा गुण आहेत, तर वेस्ट इंडिजचे चार गुण आहेत. जर वेस्ट इंडिज इंग्लंडविरुद्ध हरले तर ते स्पर्धेबाहेर पडतील आणि जर त्यांनी इंग्लंडला पराभूत केले तर दक्षिण आफ्रिकेपेक्षा जास्त असलेल्या नेट रन रेटच्या जोरावर ते उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील.

**आमने-सामने**

इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांनी एकमेकांविरुद्ध २८ आंतरराष्ट्रीय टी-20 सामने खेळले आहेत, ज्यापैकी इंग्लंडने १९ आणि वेस्ट इंडिजने आठ सामने जिंकले आहेत. टी-२० विश्वचषकात सहा वेळा हे दोन संघ आमने सामने आले आहेत आणि ते प्रत्येकी तीन सामन्यात विजयी झाले आहेत.

**संघ**

**इंग्लंड:** हेदर नाइट (कर्णधार), डॅनी वायट-हॉज, सोफिया डंकले, नॅटली सिव्हर-ब्रंट, ॲलिस कॅप्सी, एमी जोन्स, सोफी एकलस्टन, चार्ली डीन, सारा ग्लेन, लॉरेन बेल, माइया बुशेर, लिनसे स्मिथ, फ्रेया केम्प, डॅनी गिब्सन, बेस हीथ

**वेस्ट इंडिज:** हेली मॅथ्यूज (कर्णधार), आलिया ॲलेन, शमिलिया कोनेल, डिआंड्रा डॉटिन, शीमेन कॅम्पबेल, अश्मिनी मुनिसार, ॲफी फ्लेचर, स्टॅफनी टेलर, शिनेल हेन्री, चेडियन नेशन, कियाना जोसेफ, झैदा जेम्स, करिश्मा रामहारक, मँडी मंगरु, नेरिसा क्राफ्टन

**कुठल्या खेळाडूंवर लक्ष ठेवायचे**

**डॅनी वायट-हॉज:** इंग्लंडची ही उजव्या हाताची सलामीची फलंदाज या विश्वचषकात आतापर्यंत तीन सामन्यात १३५ धावा करून तिच्या संघासाठी या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारी खेळाडू आहे. ६८ च्या सरासरीने आणि १२४ च्या स्ट्राइक रेटने तिने धावा रचल्या आहेत.

**सोफी एकलस्टन:** इंग्लंडच्या या डावखुऱ्या फिरकीपटूने या विश्वचषकात आतापर्यंत तीन सामन्यात चार विकेट्स घेतल्या आहेत. जगातील अव्वल क्रमांकाच्या आंतरराष्ट्रीय महिला टी-२० क्रिकेटमधील या गोलंदाजाने किफायतशीर गोलंदाजी केली आहे. तिची इकॉनॉमी जवळपास चार धावा प्रति षटक राहिली आहे.

**स्टॅफनी टेलर:** वेस्ट इंडिजची माजी कर्णधार या विश्वचषकात तिच्या संघासाठी आतापर्यंत तीन सामन्यात ७५ धावा करत आघाडीवर आहे. या उजव्या हाताच्या फलंदाजाची सरासरी ७५ आहे आणि तिची सर्वोत्तम धावसंख्या नाबाद ४४ आहे.

**करिश्मा रामहारक:** वेस्ट इंडिजच्या या उजव्या हाताच्या ऑफस्पिनरने बांगलादेशविरुद्धच्या तिच्या मागील सामन्यात चार विकेट्स पटकावल्या होत्या. तिने या स्पर्धेत ५.३२ च्या इकॉनॉमीने एकूण पाच विकेट्स घेतल्या आहेत.

**हवामान**

हवामान किंचित ढगाळ आणि उबदार राहण्याचा अंदाज आहे. तापमान ३० अंश सेल्सिअस आणि आर्द्रता ५० टक्के असेल.

ICC WOMEN'S T20 WORLD CUP 2024

**जुईली बल्लाळ**
क्रीडा विश्लेषक, ठाणेवैभव

**सामन्याची थोडक्यात माहिती : तारीख: १५ ऑक्टोबर २०२४ | वेळ: संध्याकाळी ७:३० वाजता**
**स्थळ: दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम | प्रसारण: स्टार स्पोर्ट्स नेटवर्क, डिस्नी + हॉटस्टार**

# लाडकी बहीण योजना कायम सुरु राहणार-खा. डॉ. श्रीकांत शिंदे



**अंबरनाथ:** गेल्या अडीच वर्षांच्या काळात राज्यात झालेल्या विविध क्षेत्रातील विकास कामांमुळे राज्यभर वातावरण अनुकूल असून येत्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचेच सरकार हमखास सत्तेवर येईल, लाडकी बहीण योजना कायम सुरु राहणार, अशी ग्वाही खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली.

अंबरनाथ शहरात विविध विकास कामांचे भूमिपूजन आणि पुनर्बांधणी केलेल्या शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन तसेच अमृत योजना टप्पा -2 वाढीव पाणीपुरवठा योजनेचे आणि 40 कोटी रुपये खर्चाच्या आयटीआयमधील नवीन प्रशासकीय इमारत, कार्यशाळा आणि भोजनालय बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन आज सोमवारी खासदार डॉ. शिंदे यांच्या हस्ते आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या उपस्थितीमध्ये झाले.

शासनाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून सुरु करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेमुळे महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत. यापूर्वीच्या सरकारने अशी योजना राबवण्याचा कुणी विचार सुद्धा केला नाही, योजना सुरु झाल्यानंतर विरोधकांनी योजनेविरोधात अफवा पसरवण्याचा उद्योग सुरु केला आहे, दीड हजारांची किंमत विरोधकांना काय समजणार, असा टोला त्यांनी लगावला. मात्र लाडकी बहीण योजना कायम सुरु राहणार असून येत्या निवडणुकीत लाडक्या भावाच्या पाठीशी उभे रहाण्याचे आवाहन त्यांनी केले.

महाआघाडीच्या काळात मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाली असून अंबरनाथमध्ये देखील विकास कामे झाली असून अंबरनाथला सुरु होणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या निर्मितीमुळे अंबरनाथ येथे डॉक्टर तयार होतील, कल्याण लोकसभा मतदार संघातून तीनवेळा खासदार झालो. विरोधकांनी अपप्रचार करूनही निवडणुकीत त्याचा त्यांना फायदा झाला नाही, त्याचीच पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत महायुतीचे सरकार सत्तेवर येईल, निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांची संख्या वाढली, निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त करण्यात गैर काही नाही, मात्र महाआघाडीच्या वरिष्ठ पातळीवर ज्या उमेदवाराला उमेदवारी मिळेल त्याच्यासाठी एकजुटीने प्रचार करावेत असे मत त्यांनी व्यक्त केले.

कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, आमदार डॉ. बालाजी किणीकर, भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी आदींनी यावेळी भाषणे झाली. माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी, प्रज्ञा बनसोडे, भाजपाचे गुलाबराव करंजुले-पाटील शहराध्यक्ष सर्जेराव माहुरकर, सुभाष साळुंके यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

पान ३ वरुन

## अखेर हलक्या वाहनांना मुंबई प्रवेश टोल फ्री

दहिसर, मुलुंड-एलबीएस, आनंदनगर, ऐरोली आणि वाशी या मुंबईत प्रवेश करणाऱ्या पाचही टोल नाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण टोल माफी देण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंदर्भात मोठी घोषणा करण्यात आली. सध्या हलक्या मोटर वाहनांना 45 रुपये टोल आकारला जातो, यातून दिलासा मिळाला आहे.

गेल्या अनेक बैठकीत निर्णयांचा सपाटा लावणाऱ्या महायुती सरकारकडून या बैठकीतही अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांची घोषणा केली जाण्याची शक्यता आधीच वर्तवण्यात येत होती. गेल्या तीन मंत्रिमंडळाच्या बैठकीत 30 हून अधिक निर्णयांची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार मुंबईतील वाहन चालकांना दिलासा देणारा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी हा महायुती सरकारचा मास्टरस्ट्रोक मानला जात आहे.

**ठाण्यात भाजपचा जल्लोष**

गेली अनेक वर्षे मुंबईत प्रवेश करताना किंवा मुंबईतून बाहेर पडताना पाच टोल नाक्यांवर हलक्या आणि अवजड वाहनांना टोल भरावा लागत होता. त्यामुळे ठाण्यातील आनंद नगर, दहिसर, मुलुंड, वाशी आणि ऐरोली या टोल नाक्यांवर वाहनांच्या रांगाच रांगा लागत होत्या. परिणामी वाहतूक कोंडी, इंधनाचा अपव्यय आणि आर्थिक भुर्दंड यामुळे लाखो वाहनचालक मेटाकुटीस आले होते. याबाबत गेल्या नऊ वर्षांपासून आमदार संजय केळकर यांनी विरोधी बाकावर असताना आणि सत्तेत असतानाही अधिवेशनात आवाज उठवला, भाजपाच्या वतीने आंदोलने केली. अखेर आज महायुती सरकारच्या काळात मंत्रिमंडळाच्या बैठकीत या पाचही टोल नाक्यांवरील हलक्या वाहनांना टोलमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयाबाबत आनंद व्यक्त करण्यासाठी आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पेढे वाटून जल्लोष केला. यावेळी माजी नगरसेवक भरत चव्हाण, परिवहन सदस्य विकास पाटील, सीताराम राणे, राजेश गाडे, महेश कदम, ओंकार चव्हाण, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

याबाबत बोलताना आमदार संजय केळकर म्हणाले, टोल मुक्तीबाबत आम्ही गेल्या नऊ वर्षात वारंवार आंदोलने केली आहेत, अधिवेशनात आवाज उठवला आहे. मात्र आता हलक्या वाहनांना टोल मुक्ती देण्याचा मोठा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे वाहतूक कोंडी दूर होईलच, शिवाय इंधनाची बचत होऊन ठाणेकरांची आर्थिक बचतही होणार आहे. या निर्णयाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ठाणेकरांच्या वतीने आभार मानतो, अशा भावना श्री. केळकर यांनी व्यक्त केल्या.

याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्तेत असतानाही टोलमुक्तीसाठी आंदोलन केल्याची आठवण करून दिली. नागरिकांना दिलेले वचन या निर्णयाने पूर्ण झाल्याचे समाधानही त्यांनी प्रतिक्रिया देताना व्यक्त केले. गेल्या नऊ वर्षांत आम्ही विरोधी बाकावर असताना आणि सत्तेत असताना देखील आंदोलने केली, अधिवेशनात वाचा फोडली. अखेर महायुती सरकारने टोल मुक्तीचा निर्णय घेतला, त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ठाणेकरांच्या वतीने आभार मानतो, अशी प्रतिक्रिया आमदार संजय केळकर यांनी दिली. तर मनसेमुळेच मागील काळात 65 टोलनाके बंद झाल्याचे मनसे नेते अविनाश जाधव यांनी सांगून केवळ राज ठाकरे यांच्यामुळेच आज टोलमुक्तीचा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले.

## जुना विकास आराखडा दमला; ठामपाने नवीन आराखडा

नव्या विकास आराखड्याचा हप्त तयार करण्यात आला आहे. आरोग्य व्यवस्था समाधानकारक असून शहरात अनेक मोठ्या खाजगी शाळा आल्याने शैक्षणिक व्यवस्थाही चांगली आहे. वाढत्या अतिक्रमणांमुळे सीआरझेडचे मार्किंग करणे आवश्यक असल्याचे तज्ञांचे म्हणणे आहे. शहरात नालेविकास देखील बऱ्यापैकी झाला असून पाणीपुरवठा रस्त्यांची कामे देखील 60 टक्क्यांपेक्षा अधिक झाली आहेत. त्यामुळे नव्या आराखड्यात मिसिंग लिंकचा विकास करणे आवश्यक आहे. याशिवाय जुन्या विकास आराखड्याप्रमाणे विभाग निहाय विकास देखील झाला स्पष्ट झाले आहे.

बुलेट ट्रेन, शहरातून जाणारी मुख्य मेट्रो, मुख्य मेट्रोला कनेक्टिव्हिटी म्हणून नियोजित करण्यात आलेली अंतर्गत मेट्रो, कोस्टल रोड आणि आशिया खंडातील पहिलाच मोठा प्रकल्प असलेली क्लस्टर योजना अशा मोठ्या प्रकल्पांचे नियोजन यापूर्वीच झाल्याने नव्या विकास आराखड्यात फारसा बदल होणे अपेक्षित नसल्याची माहिती सूत्रांची आहे.

विकास आराखड्यातील गेल्या 20 वर्षात ठाणे महापालिकेचे कचरा व्यवस्थापन बिघडलेलेच असल्याचे स्पष्ट झाले आहे. डायघर येथे प्रकल्प सुरु केला असला तरी तो देखील अद्याप पूर्ण क्षमतेने सुरु करता आलेला नाही. एवढ्या वर्षात महापालिकेला स्वतःचे डम्पिंग ग्राउंड देखिल निर्माण करता आलेले नाही. त्यामुळे नव्या विकास आराखड्यात कचरा व्यवस्थापन कळीचा मुद्दा ठरणार आहे.

## 'माझी टीएमटी' मोबाईल अ‍ॅपद्वारे प्रवाशांना मिळणार तिकीट



महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, माजी नगरसेवक विकास रेपाळे, नम्रता भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

या मोबाईल अ‍ॅपद्वारे प्रवाशांना यूपीआय वापरुन डिजिटल तिकिट काढता येईल. तसेच, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंगचा वापर करुन पैसे भरता येतील.

त्याचप्रमाणे, प्रवाशांना बस कोठे आणि किती वेळेत स्टॉपवर येणार याची माहिती देण्याची सुविधाही या अ‍ॅपमध्ये आहे. प्रवाशांना अ‍ॅपवर प्रवासाच्या सुरुवातीचे ठिकाण आणि गंतव्य स्थान यांची माहिती भरून बसमार्ग, त्या मार्गावरील उपलब्ध बसगाड्या, त्यासाठी लागणारे तिकिट भाडे याचीही माहिती मिळणार आहे.

डिजिटल तिकिटांच्या व्यवस्थेमुळे वाहकांची रोख रक्कम हाताळण्याची संख्या कमी होईल आणि सुटे पैसे नसल्याने प्रवासी आणि वाहक यांच्यात होणारे वाद यामुळे टळतील, अशी अपेक्षाही टीएमटी व्यवस्थापनाला आहे. सध्या अँण्ड्राइड तिकिटांची ही सुविधा काही बसमार्गावर सुरु करण्यात आली आहे. ती टप्प्याटप्प्याने टीएमटीच्या सर्व बसमार्गांवर प्रवाशांना वापरता येणार असल्याचे टीएमटी व्यवस्थापनाने सांगितले.


**जाहीर सुचना**

हे सर्वसाधारण जनतेच्या माहितीसाठी कळविण्यात येते की दिनांक 09/09/1981 रोजी विक्री करारानुसार मेसर्स ताज बिल्डर्स यांनी "राजधानी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीतील बिल्डिंग नं. १७-बी मधील फ्लॅट नं. ७, ५३५ स्क्वेअर फूट कार्पेट एरिया असलेल्या पहिल्या मजल्यावरील सदनिकेची विक्री श्रीमती पुष्पाबेन मुकुंद देशपांडे यांना केली.त्यानंतर दिनांक १२/०६/१९८८ रोजी विक्री करारानुसार, श्रीमती पुष्पाबेन मुकुंद देशपांडे यांनी फ्लॅट नं. ७, बिल्डिंग नं. १७-बी श्री. पांडुरंग रुणाजी गांगुर्डे यांना विकला.त्यानंतर दिनांक २०/०५/२००० रोजी श्री. पांडुरंग रुणाजी गांगुर्डे यांनी फ्लॅट नं. ८, बिल्डिंग नं. १७-बी श्री. आलोक अशोक गांगुर्डे (माझ्या क्लायंट) यांना देणगीपत्राद्वारे दिला.आता कळविण्यात येते की दिनांक १२/०६/१९८८ रोजी श्रीमती पुष्पाबेन मुकुंद देशपांडे व श्री. पांडुरंग रुणाजी गांगुर्डे यांच्यातील फ्लॅट नं. ७, बिल्डिंग नं. १७-बी च्या विक्री कराराची मूळ प्रत हरवली आहे. ती सर्व प्रयत्न करूनही सापडत नाही.माझे क्लायंट, श्री आलोक अशोक गांगुर्डे, यांना सदर फ्लॅट गहाण ठेवून कर्ज सुविधा घ्यायची आहे, त्यासाठी हरवलेल्या विक्री करारासंबंधित दावा, हक्क, शीर्षक, स्वारस्य इत्यादी कोणत्याही व्यक्तींकडून असल्यास, त्यांनी कळविणे आवश्यक आहे.तरी कोणत्याही व्यक्तीने हक्क, मालकी, वारसा, गहाण, मालकी हक्क, विक्री, देणगी, भाडेपट्टा, चार्ज, ट्रस्ट, देखभाल, हक्क किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे दावे असल्यास त्यांनी या प्रसिद्धीनंतर १० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात माहिती द्यावी. अन्यथा, माझा क्लायंट कोणत्याही दाव्यांच्या आधीच संबंधित बँकेकडे गहाण ठेवण्यासाठी पुढील कारवाई करेल.

दिनांक: १४/१०/२०२४

**हितेश दिनकरराय पटेल**
अधिवक्ता उच्च न्यायालय
ब्लॉक नं. ९, बिल्डिंग नं. २५, श्री गोविंद नगर सोसायटी,
गोविंद नगर, एमसीएफ क्लबजवळ,
बोरीवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२
फोन नं. ९८२०४३०१७८


## उल्हासनगर महापालिका कर्मचाऱ्यांना १७ हजार रुपये बोनस

बैठकीत अतिरिक्त आयुक्त जमिर लेंगरेकर, मुख्य लेखा अधिकारी, किरण भिलारे, मुख्य लेखा परिक्षक, शरद देशमुख,जनसंपर्क अधिकारी, छाया डांगळे, लेबर फ्रन्ट यूनियनचे श्याम गायकवाड, दिपक दाभणे, अखिल भारतीय सफाई मजदुर कामगार युनियनचे चरणसिंग टाक, आसाराम टाक, भारतीय कामगार संघटनेचे राधाकृष्ण साठे, मनसेचे दिलीप थोरात तसेच इतर प्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते.

### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान

# धसई केंद्रशाळा ठरली द्वितीय क्रमांकाची मानकरी




**शहापूर:** सन 2023 -24 यावर्षी सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान अंतर्गत झालेल्या मूल्यांकनात शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रशाळा धसई शाळेस द्वितीय क्रमांकाचे दोन लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

जिल्हा परिषद केंद्रशाळा धसई शाळेस प्रशस्त क्रीडांगण, सुंदर सजावट, प्रशस्त इमारत, मुला-मुलींसाठी स्वच्छ सुंदर स्वच्छतागृहे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मनमोहक वृक्ष लागवड व परसबाग निर्मिती , मंथन, एनएमएमएस शिष्यवृत्ती, 5 वी व 8वी शिष्यवृत्ती या स्पर्धा परीक्षेतील दरवर्षी गुणवत्ता यादीत झळकणारे विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत धसई, सर्व पालकवर्ग व धसई ग्रामस्थ बंधू-भगिनिंचे, विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांचे मिळणारे बहुमोल सहकार्य या सर्व बाबींमुळे या शाळेस पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने नुकताच झालेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यात द्वितीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.

शाळेच्या सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकासात प्रेरणा देणारे गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण, धसई बीट विस्ताराधिकारी डॉ. प्राजक्ता राऊत, धसई केंद्राचे केंद्रप्रमुख शरद भोईर तसेच शाळेचे मुख्याध्यापक मालू शिद, शिक्षक अरुण पष्टे, अनिल वाढविंदे, निळकंठ विशे, डॉ. हरिश्चंद्र भोईर, विजय शेंगाळ, सुषमा खरजे या सर्वांनी बहुमोल योगदान दिले आहे. या सन्मान सोहळ्यात आ.दौलत दरोडा, माजी आमदार पांडुरंग बरोरा, गटविकास अधिकारी श्री.सोनवणे यांच्या हस्ते शाळेस सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. शाळेस द्वितीय क्रमांकाचे दोन लाख रुपयांचे बक्षीस व सन्मानचिन्ह मिळाले असून हा पुरस्कार स्वीकारताना शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा वैशाली फर्डे, सदस्या मनिषा विशे व सर्व सदस्य उपस्थित होते.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**दिपावली उत्सव २०२४ मार्गदर्शक सुचना.**

**संदर्भ :** १. राष्ट्रीय हरित लवाद आदेश क्र. २४९/२०२० दि. ०९.११.२०२०
२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे पत्र MPCB/JD(APC)/GRAP/TB/B-०१४४ दिनांक १३.१०.२०२३

यावर्षी दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ दरम्यान दिपावली उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सव साजरा करताना सर्व नागरीकांनी आरोग्याच्या दृष्टीकोनातून योग्य ती खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना करण्यात येत आहेत.

१. ठाणे शहराची हवेची गुणवत्ता "मध्यम" या वर्गवारीतील असल्याने, राष्ट्रीय हरित लवाद आदेश क्र. २४९/२०२० दि. ०९.११.२०२० च्या निर्देशानुसार ठाणे शहरात फक्त हरित फटाके विकण्यास परवानगी असेल.

२. तसेच सणाच्या कालावधीत उदा. दिवाळी, छटपूजा, गुरपूरब, ख्रिसमस, न्यू इयर इत्यादी सणांच्या कालावधीत दोन तासांकरीता फटाके फोडण्यास परवानगी असेल. दिवाळी आणि गुरपूरब कालावधीत सायंकाळी ८:०० ते १०:००, छटपूजा कालावधीत सकाळी ६:०० ते ८:०० ख्रिसमस आणि न्यू इयर कालावधीत रात्री ११:०० ते १२:३० या कालावधीत फटाके वाजवण्यास परवानगी असेल.

३. फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करू नये. तसेच परवानगी असलेले फटाके महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करणे अनिवार्य आहे. ठाणे महानगरपालिका हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणाऱ्या नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.S.R. ६८२ (E), दि. ०५.१०.२०२२ अन्वये १२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे.

४. हरित दिपावली व पर्यावरणपूरक दिपावली साजरी करण्यासाठी नागरिकांनी हरित फटाक्यांचा वापर करावा.

ठामपा/पिआरओ/प्र.नि.क/८१०/२०२४-२५
दि:१४.१०.२०२४

**सही/-**
अतिरिक्त आयुक्त (२)
ठाणे महानगरपालिका,ठाणे

pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in


## वेळूकमधील ग्रामस्थांचे कसारा पोलिस स्टेशनबाहेर आमरण उपोषण

**कसारा:** येथून 10 ते 12 कि मी अंतरावर असलेल्या वेळूक गावातील हनुमान मंदिर ठेकेदार आणि पोट ठेकेदार यांनी ग्रामस्थांना विचारात न घेता तोडल्याचा ठपका ठेवून आणि संबंधित ठेकेदार व पोटठेकेदार यांच्या विरोधात कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ कसारा पोलिस कार्यालयासमोर वेळूक चे उपसरपंच प्रकाश भोईर आणि सहकारी ग्रामस्थांनी आमरण उपोषण सुरु केले आहे.

याच जागेवर आमदार निधीतून समाज हॉल उभारले जाणार असले तरी सद्यस्थितीत हनुमानाची मूर्ती उघड्यावर असल्याने आमच्या धार्मिक भावना दुखावल्या असल्याचे उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे.


**नवी मुंबई महानगरपालिका**

**शहरअभियंताविभाग**

**निविदा सुचना क्र.नमुंमपा/श.अ/का.अ.(ऐरोली)/271/2024-25**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | ऐरोली विभागातील चिंचपाडा येथील नमुंमपा शाळा क्र. 53 मधील अग्निशमन यंत्रणेची सुधारणा करुन वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹.2,24,570/- |
| 2 | ऐरोली विभागातील चिंचपाडा येथील नागरी आरोग्य केंद्रातील अग्निशमन यंत्रणेची सुधारणाकरुन वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹.2,22,670/- |
| 3 | ऐरोली विभागातील सेक्टर-4 येथील भुखंड क्र. 2 येथील समाज मंदिर इमारतीमधील अग्निशमन यंत्रणेची सुधारणा करुन वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹.2,34,900/- |
| 4 | ऐरोली विभागातील जी विभाग कार्यालय इमारत व समाज मंदिर इमारतीमधील अग्निशमन यंत्रणेची सुधारणा करुन वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹.2,44,450/- |
| 5 | ऐरोली विभागातील चिंचपाडा येथील नमुंमपा ग्रंथालयामध्ये अग्निशमन यंत्रणा नव्याने बसविणे व Fire Extinguisher पुरविणे. | ₹.1,43,050/- |
| 6 | ऐरोली विभागातील से.8 मधील सिल्व्हीया अपार्टमेंट जवळील गटर व पदपथाची दुरुस्ती करणे | ₹.2,43,024/- |
| 7 | ऐरोली विभागातील दिवागाव सिताराम मढवी यांच्या घराजवळील गटर दुरुस्ती करणे | ₹.2,44,620/- |
| 8 | ऐरोली विभागातील दिवा गाव येथे विविध ठिकाणी पदपथाची सुधारणा करणे | ₹.2,34,423/- |
| 9 | ऐरोली विभागातील से.8 व 9 येथे S.S. Bollard बसविणे | ₹.2,26,860/- |
| 10 | ऐरोली विभागातील से.09 दिवागावातील अंगणवाडी मध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ₹.2,19,580/- |

**निविदा पुस्तिका दि.17/10/2024 ते दि.24/10/2024 या कालावधीत दुपारी 1.00 वाजेपर्यंत विक्रीस उपलब्ध होतील. मोहरबंद निविदा दि.24/10/2024 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, आवक-जावक कक्ष, तळमजला प्लॉट नं. 1 व 2, गोवर्धनी चौक, से.15 ए, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे ठेवण्यांत आलेल्या पेटीत टाकण्यात याव्यात.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**(मदन ग. वाघचौडे)**
**कार्यकारी अभियंता (ऐरोली)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/660/2024**


'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून २०३/२०४, अ‍ॅडीजोन, अल्मेडा सिग्नलजवळ, पिनॅकल हॉस्पिटल समोर, एलबीएस मार्ग, ठाणे ४०० ६०१ ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

आम्हा घरी धन । शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे । यत्ने करू।।

## टोलमाफी: निवडणुकीचे वर'दान'!

निवडणुका: लोकशाहीसाठी शाप की वरदान या विषयावर निबंध लिहिण्यास आजच्या विद्यार्थ्याला कोणी सांगितले तर तो वरदान म्हणूनच त्याकडे बघेल आणि भरभर लिहीलसुद्धा! गेल्या सात-आठ दिवसांत इतक्या सरकारी प्रकल्पांची उद्घाटने झाली आणि तितक्याच प्रमाणात भूमीपूजने झाली, हे लक्षात घेतले तर वरदान हा शब्द अधोरेखित करावा लागेल. इतकी उद्घाटने झाल्यामुळे विकासाची फळे अचानक बाजारात आल्याची अनुभूती सर्वांना झाली. अर्थात निवडणुकीच्या 'सिझन'मधील ही फळे मात्र लोकशाही नामक झाडास पाच वर्षांतून एकदाच कशी येतात, असा प्रश्न अनेकांना पडला असेल तर तोही स्वाभाविकच म्हणावे लागेल! एरवी या झाडाची हवी तशी छाटणी केली जात असते आणि काही वेळा तर ती झाडे मुळापासून उखडलीही जात असतात. राजकीय पक्ष (की पक्षी?) या झाडांच्या फांद्यांवर क्षणभर विश्रांतीसाठी थांबतात. त्यापैकी काही घरटीही बांधतात. असो, फळे मात्र झाडाच्या सावलीत बसणाऱ्यांना पाच वर्षांतून एकदाच यायला मिळतात.

ठाण्याच्या सीमेवर असलेल्या लोकशाहीच्या झाडास तब्बल दहा वर्षांनी फळ लागले आहे. त्यास 'टोल-माफी'असे म्हटले जाते. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी फळे येतील, येतील असे वाटत असताना अचानक टोळधाड पडत असे. यंदा तसे झाले नाही. टोल अखेर माफ झाला! आम्हाला तो दिवस आणि ते ऐतिहासिक छायाचित्र आजही आठवते जेव्हा की विधानसभेत प्रथमच निवडून गेलेले आजचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, प्रताप सरनाईक आणि राजन विचारे यांनी टोल न भरता सीमा पार केली होती. आपणही तसे करु शकतो असे वाटणाऱ्या भाबड्या ठाणेकरांना टोल-कर्मचाऱ्यांच्या 'सौजन्यशील' वर्तनाचा अनुभव घ्यावा लागला होता. तब्बल दहा वर्षांनी अखेर टोल माफ झाला आहे आणि तो आमच्यामुळेच यावरुन अहमहमिका सुरु झाली आहे. टोलपासून सुटका म्हणजे मतांचा वाढणार टक्का हा साधा-सोपा हिशेब मांडला गेला असेल तर त्यात नवल काही नाही! टोलविरोधी आंदोलन छेडणाऱ्या मनसेने आज पेढे वाटून रितसर श्रेय घेतले. उद्या अविनाश जाधव जर ठाण्यातून निवडणूक रिंगणात उतरले तर त्यांना 'टोल'-मोलके मतदान होऊ शकते!

टोल माफीमुळे ठाणेकर सुखावला आहे जरुर, पण आपल्यावर ही मेहेरबानी नेमकी कोणी केली याबद्दल त्यांच्या मनात गोंधळ आहे. तो दूर करण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष टोलनाक्याजवळ आणि गावभर फलक लावून श्रेय घेण्याचे प्रयत्न करतील. अशावेळी आम्ही याच नेत्यांना विनंती करु की त्यांनी बसथांब्यांवर ताटकळत उभ्या रहाणाऱ्या आणि रिक्षाचालकांच्या मग्रुरीने त्रस्त झालेल्या प्रवाशांकडेही थोडे लक्ष द्यावे. बाकी टोलमाफीबद्दल सर्वांचे अभिनंदन. निवडणुकीचे वर'दान' आम्ही आनंदाने स्वीकारतो.

## केडीएमटीतील कर्मचाऱ्यांना अखेर पेन्शन लागू

### परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील यांच्या प्रयत्नांना यश



**कल्याण :** कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत सन 2000 नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याला अखेर हिरवा कंदील मिळाला आहे. परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

अध्यक्ष रवी पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सतत पाठपुरावा केला असून मुख्यमंत्र्यांनी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याचे आदेश देऊ केले आहेत. याबाबत केडीएमटी कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत 2000 सालानंतर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना पेन्शन योजनेपासून रोखण्यात आले होते. याबाबत परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील गेल्या अनेक महिन्यांपासून या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळण्याकरीता प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. रवी पाटील यांनी पेन्शन योजना लागू होण्याकरता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खा. श्रीकांत शिंदे यांच्याकडे सतत पाठपुरावा केल्याने कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा प्रश्न अखेर निकाली निघाला आहे.

## डोंबिवलीची माती ही नवरत्न घडवणारी - रविंद्र चव्हाण

**कल्याण :** राज्याची सांस्कृतिक उपराजधानी अशी बिरुदावली मिळवलेल्या डोंबिवली शहराने आतापर्यंत अनेक उत्तमोत्तम कर्तृत्ववान नवरत्ने दिली आहेत. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची जाणीव डोंबिवलीकरांच्या मनामध्ये सदैव राहण्याच्या उद्देशाने भित्तीचित्रांच्या माध्यमातून त्यांना मानवंदना देण्यात आली आहे.

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून डोंबिवली स्टेशन परिसरात राबवण्यात आलेल्या या अनोख्या उपक्रमाचे दसऱ्याच्या पुर्वसंध्येला लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र सुर्यवंशी, शशिकांत कांबळे, माजी विरोधी पक्षनेते मंदार हळबे, माजी नगरसेवक शैलेश धात्रक, विकास म्हात्रे, नंदू परब आदी भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्राची सांस्कृतिक उपराजधानी म्हणून डोंबिवली शहराची किर्ती आहेच. यासोबतच एक साहित्यनगरी, क्रीडा नगरी, उद्योग नगरी म्हणूनही अनेक डोंबिवलीकरांनी अथक मेहनतीद्वारे शहराची ही ओळख घडवली आहे. डोंबिवली शहराला सातासमुद्रापार घेऊन जाणारे हे डोंबिवलीकर इतरांसाठी



### भित्तीचित्रांच्या माध्यमातून कर्तृत्ववान डोंबिवलीकरांना मानवंदना

आयडॉल असून डोंबिवलीची माती ही नवरत्न घडवणारी असल्याचे गौरवोद्गार सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी या लोकार्पण सोहळ्यात काढले.

या सर्व दिग्गजांच्या कर्तृत्वाची जाणीव डोंबिवलीकरांच्या मनात सदैव रहावी आणि डोंबिवलीकरांच्या पुढच्या पिढीला या सर्वांच्या कार्यातून प्रेरणा मिळावी. या उद्देशाने विविध क्षेत्रात नावलौकिक गाजवणाऱ्या, त्यांच्या क्षेत्रात प्रथम ठरलेल्या डोंबिवलीकरांचा गौरव म्हणून डोंबिवली रेल्वे स्टेशनच्या दोन्ही बाजूस सुशोभिकरण करून त्यांची भित्तीचित्रे लावण्यात आली आहेत.

शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा अशा रीतीने सन्मान करणारे आपले डोंबिवली शहर हे देशातील पहिले शहर ठरले आहे. जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यातून डोंबिवली शहरात येणाऱ्या प्रत्येकाला ही भित्तीचित्रे बघून आपल्या शहरात देखील अशाच नावीन्यपूर्ण गोष्टी निर्माण व्हाव्यात, असं नक्कीच वाटेल. इतर शहरांमध्येही या संकल्पनेचे अनुकरण होईल असा विश्वास व्यक्त करत डोंबिवलीचा हा उज्ज्वल इतिहास आपण स्वतः जरुर पहावा, वाचावा आणि लोकांना सांगावा, असे आवाहनही मंत्री श्री. चव्हाण यांनी यावेळी केले.

## कडोंमपाच्या वतीने प्रेरणा वॉर मेमोरिअलचे भूमिपूजन

**कल्याण :** तरुणांना सैन्यदलात भरती होण्यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इंदुराणी जाखड यांच्या निर्देशानुसार उभारण्यात येणाऱ्या प्रेरणा वॉर मेमोरिअलचे भूमिपूजन पद्मश्री गजानन माने यांच्या हस्ते करण्यात आले.

भारतीय संरक्षण दलाची क्षमता वाढवणे आणि तरुण मुले, विद्यार्थी, पालक यांना आपल्या सैन्य दलाविषयी जास्तीत जास्त माहिती उपलब्ध करून देणे. तरुण मुलामुलींना सैन्य दलात भरती होण्यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित तसेच माजी सैनिक, पद्मश्री गजानन माने यांच्या संकल्पनेतून उभारण्यात येणाऱ्या प्रेरणा वॉर मेमोरिअल या नाविन्यपूर्ण अशा मोटिवेशन प्रकल्पाचे भूमिपूजन दसऱ्याच्या मुहूर्तावर करण्यात आले.



याप्रसंगी कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी प्रकल्पाचे महत्त्व उपस्थितांना सांगितले.

या प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीपैकी 2 कोटी 70 लाख रुपये ठाणे जिल्हा नियोजन समितीने मंजूर केले आहे. पद्मश्री माने यांनी त्यांचे विचार व्यक्त करताना किमान 7 महिन्यात हा प्रोजेक्ट पूर्ण होईल असे सांगितले. भूमिपूजनासाठी प्रकल्प आर्किटेक्ट धनश्री भोसले, उप अभियंता विसपुते आणि अनेक सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी तसेच नागरिक उपस्थित होते.

## कल्याण लोकसभेतील देवस्थानांच्या विकासासाठी १२ कोटी

### खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

**कल्याण :** खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे कल्याण लोकसभा मतदारसंघातील देवस्थानांचे सुशोभीकरण करण्यासाठी राज्याच्या पर्यटन विकास विभागाच्या माध्यमातून 12 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीच्या माध्यमातून मंदिराचा परिसर विकसित करण्यात येणार आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून मतदारसंघात मागील काही वर्षात अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागले आहेत. शहरात पायाभूत सुविधांची उभारणी करण्यासह आपल्या संस्कृतीचे जतन - संवर्धन करण्यासाठी खा. डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जात असतात. अंबरनाथ येथील शिलाहारकालीन शिवमंदिर परिसर सुशोभित करुन जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन स्थळ बनवण्यासाठी खा. शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले. यासाठी सुमारे 140 कोटी रुपयांचा निधी देखील मंजूर करण्यात आला असून याचे काम प्रगतीपथावर आहे.

तर खिडकाळी येथील प्राचीन शिवमंदिर परिसराचा विकास करण्यासाठी देखील खा.शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे 10 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून याचे काम देखील प्रगतीपथावर आहे. याच पार्श्वभूमीवर कल्याण लोकसभा मतदारसंघातील इतर मंदिर परिसराचा देखील विकास करण्यात येत आहे. खासदार डॉ.शिंदे यांच्या पाठपुराव्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे कल्याण तालुक्यातील कांबा - पावशेपाडा येथील शिवमंदिर सुशोभीकरण, मुंब्रा देवी परिसर सुशोभीकरण, खरवली देवी परिसर सुशोभीकरण करण्यासाठी राज्याच्या पर्यटन विकास विभागाच्या माध्यमातून 12 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

या मंदिरात दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी विविध पायाभूत सुविधांची उभारणी करण्यासह मंदिर परिसराचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. या देवस्थानांच्या विकासासाठी देण्यात आलेल्या एकूण 12 कोटी रुपयांच्या निधीच्या माध्यमातून कांबा पावशेपाडा येथे शिवमंदिर परिसर सुशोभीकरण टप्पा 2 साठी 2 कोटी, मुंब्रा देवी परिसर सुशोभीकरणासाठी 5 कोटी तर खरवली देवी परिसर विकसित करण्यासाठी 5 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

## 'इंग्रजी शाळांना मोठ्या प्रमाणात परवानगी दिल्याने मराठी शाळांची संख्या कमी'

**कल्याण :** इंग्रजी शाळांना मोठ्या प्रमाणात परवानगी दिल्याने मराठी शाळांची संख्या कमी झाली असल्याचे मत विधानपरिषद आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी व्यक्त केले.

कल्याणमध्ये बहुजन शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संसदेच्या वतीने जागृती मेळाव्याचे आयोजन आचार्य अत्रे रंगमंदिर येथे केले होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले.

मराठी शाळा बंद होण्याची मुख्यत्वे दोन कारणे असून त्यापैकी एक म्हणजे मोठ्या प्रमाणात राज्य सरकारने इंग्रजी शाळांना परवानगी दिली आहे. गेल्या 7 ते 8 वर्षात तब्बल 10 हजाराच्या वर इंग्रजी शाळा मंजूर केल्या. त्यामुळे गाव पातळीवर देखील




इंग्रजी शाळा झाल्या. मात्र याठिकाणी इंग्रजी भाषेत शिक्षण देणारे शिक्षकच उपलब्ध नाहीत. या इंग्रजी शाळांमध्ये मराठी शाळांमधील विद्यार्थीच प्रवेश घेत असल्याने या विद्यार्थ्यांच्या स्थलांतरामुळेच मराठी शाळा ओस पडल्या आहेत, असे ते म्हणाले.

दुसरं कारण म्हणजे मराठी शाळांचा दर्जा चांगला राखला जाऊ शकला नाही, याला राज्य शासनाचे धोरण कारणीभूत आहे. शासनाच्या 2015 च्या धोरणामुळे शिक्षकांची संख्या कमी झाली असून यामुळेच मराठी शाळांची संख्या कमी झाली असल्याची टीका आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी केली आहे.

यावेळी बहुजन शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संसदेचे अध्यक्ष डॉ. अशोक बहिरव, माजी शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य सुनील चौहान, नॅशनल कॉलेज कल्याणचे प्राचार्य अब्दुला खान आदी मान्यवर उपस्थित होते.

## तिसगावची नेहा गायकवाड कुस्तीत जिल्ह्यात पहिली




**कल्याण:** जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड व पोलीस मुख्यालय नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण विभाग अंतर्गत शालेय कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन पोलीस उप-आयुक्त संजयकुमार पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी मुलींच्या स्पर्धेत तिसगावची रहिवासी, जय गावदेवी कुस्ती संकुल पिसवली तालीमचे अध्यक्ष श्रीपत भोईर आणि इंटरनॅशनल प्रशिक्षक रंगनाथ हरणे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील पैलवान नेहा अनंता गायकवाड हिने 73 किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला.

यावेळी नेहाला सुवर्णपदक देऊन तिचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्याच्या स्पर्धेत नेहाची निवड झाल्याबद्दल तिच्या कुटुंबासह गावातील नागरिकांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला.

## हिंदुत्वासाठी भाजपलाच सहकार्य करण्याचा २५० सार्वजनिक मंडळांचा निर्धार

**कल्याण :** हिंदुत्वासाठी भाजपलाच सहकार्य करणार असल्याचा निर्धार डोंबिवलीमधील विविध सामाजिक संस्था, सार्वजनिक मंडळांनी केला. रविवारी सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून संत सावळाराम क्रीडा संकुल येथील मेळाव्यात मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मत व्यक्त केले.

मंत्री चव्हाण यांनी माझे हात बळकट करण्यासाठी साथ द्या असे आवाहन करताच 'रविंद्र चव्हाण आगे बढो, हम तुम्हारे साथ है' चा नारा उपस्थित मंडळींनी दिला. भारताला पुढे नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सक्षम नेतृत्व असून जगभरात भारताचे नाव त्यांनी उज्ज्वल केले आहे. आता राज्यात महायुतीचे सरकार निवडून आणण्यासाठी सगळ्यांची साथ महत्वाची आहे अशी भावनिक साद मंत्री श्री.चव्हाण यांनी घातली. त्याला प्रतिसाद देत शेकडो मंडळाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी समर्थन दर्शवले.

भाजपच्या 143 विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा रविवारी मंत्री श्री. चव्हाण यांनी मेळावा घेतला, त्यालाही चार हजार कार्यकर्ते उपस्थित होते. संत सावळाराम क्रीडा संकुलामधील नमो रमो दांडिया रास उत्सवाच्या पेंडॉलमध्ये मेळावा संपन्न झाला. त्यावेळी जिल्हाध्यक्ष नाना सूर्यवंशी, माजी नगरसेवक मंदार हळबे, राहुल दामले, शैलेश धात्रक, विकास म्हात्रे, खुशबू चौधरी, शशिकांत कांबळे, नंदू परब यांसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते

निवडणुकीला कसे काम करावे, प्रचार- प्रसार कसा करावा, मतदारांपर्यंत काय मुद्दे न्यावेत याबाबत मंत्री चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळीही उपस्थितांनी जय श्रीराम, वंदे मातरम, भारत माता की जयच्या घोषणांनी सभामंडप दणाणून सोडला होता.

## जनसंपर्क कार्यालयाच्या शेडवरील कारवाईनंतर शिवसेना ठाकरे गट आक्रमक

**कल्याण :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी नगरसेवक दयाशंकर शेट्टी यांचे जनसंपर्क कार्यालय सुरु होण्यापूर्वी शेड बांधून उद्घाटन होण्यापूर्वीच पालिकेने शेडवर कारवाई केली आहे. त्यामुळे सोमवारी उबाठा गटाच्या पदाधिकाऱ्यांनी "अ" प्रभागक्षेत्र कार्यालयावर धडक देत सहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांना धारेवर धरले.

अखेर "अ" प्रभाग सहाय्यक आयुक्तांनी पदाधिकाऱ्यांच्या तक्रारीवरुन कारवाई केली. तसेच दिलगिरी व्यक्त केल्याने उबाठा गटाचे शिवसैनिक शांत झाले. याप्रसंगी शिवसेना उपशहर प्रमुख सुरेश सोनार यांनी प्रतिक्रिया दिली की, राजकीय आकसापोटी जनसंपर्क कार्यालयाच्या शेडवर कारवाई केली गेली. सहाय्यक आयुक्तांना अ प्रभागातील अनधिकृत इमारतीची बांधकामे दिसत नाहीत का? जनसंपर्क कार्यालयात आपल्या समस्या सोडवण्यासाठी येणाऱ्या नागरिक, ज्येष्ठांच्या सोयीसाठी निवारा शेड उभारली होती. अ प्रभाग सहाय्यक आयुक्त यांनी कारवाई संदर्भात दिलगिरी व्यक्त केली असल्याचे सांगितले.

याप्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी, उपजिल्हा प्रमुख माजी नगरसेवक विजय काटकर, माजी नगरसेवक दयाशंकर शेट्टी, उपशहर प्रमुख सुरेश सोनार, सुरेश पाटील, ऋषिकांत पाटील, लक्ष्मण तरे, शत्रुघ्न तरे, नयन पाटील, विजय कोट, विजय पाटील, संजय शेळके आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक आरोग्य विभाग

निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १५ वा वित्तआयोगांतर्गत ४८ अटेंडंट पदे बाहयस्त्रोत यंत्रणेव्दारे भरण्याकरीता ऑनलाईन द्विवार्षिक निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि.१५/१०/२०२४ ते दि.२८/१०/ २०२४ पर्यंत संध्याकाळी १६.०० वाजेपर्यत उपलब्ध होतील. दि.२८/१०/२०२४ रोजी संध्याकाळी १६.०० वाजेपर्यत ऑनलाईन निविदा स्विकारण्यात येतील. दि.३०/१०/२०२४ रोजी संध्याकाळी १६.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील.कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार ठाणे महापालिकेने राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/८१३/२०२४-२५ सही/-
दि:१४.१०.२०२४ वैद्यकीय आरोग्य अधिकारी
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक आरोग्य विभाग

जाहिरात

ठाणे महानगरपालिकेच्या विविध प्रसुतीगृह व रुग्णालयांकरीता तीन वर्षाच्या कालावधीकरीता मानद वैद्यकीय तज्ञांचे पॅनेल तयार करण्यास व वेद्यकीय तज्ञांना केसेस बेसिसवर निश्चित केलेल्या दराने पॅनेलवर समाविष्ठ करणेस दि.१५/१०/२०२४ ते दि.२१/१०/२०२४ या कालावधीत इच्छुक वैद्यकीय तज्ञांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी अर्ज मागविण्याकरीता आवश्यक कागदपत्र इतर माहिती www. thanecity. gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/८०१/२०२४-२५ सही/-
दि:१४.१०.२०२४ वैद्यकीय आरोग्य अधिकारी
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

क्रीडा विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या क्रीडा विभागामार्फत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृह, भारतरत्न सचिन तेंडूलकर मिनी क्रिडा संकुल, शहिद हेमंत करकरे मिनी क्रिडा संकुल व श्री शदरचंद्रजी पवार मिनी क्रिडा संकुल या वास्तुची दैनंदिन सकाळ व दुपार सत्रात नियमित साफसफाई करणेच्या कामाकरिता सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.सदरच्या कामाचे निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.१५/१०/२०२४ पासून उपलब्ध असून ई-टेंडरींग पध्दतीने दि. ०४.११.२०२४ रोजी दुपारी १३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदेचा तांत्रिक लिफाफा दि.६.११.२०२४ रोजी दुपारी १७.०० वा किंवा निविदा उघडण्याची पूर्व सुचना देऊन निविदाकार अथवा त्यांच्या प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील. शासनमान्य अंगिकृत संस्था तसेच उपक्रम यांनी सुध्दा महानगरपालिकेच्या अटी -शर्तीस अधिन राहून निविदा भरण्यास हरकत नाही.प्राप्त झालेली कोणतीही निविदा पुर्णत: अथवा अंशत: स्विकारणे किंवा नाकारण्याचे हक्क ठाणे महानगरपालिकेकडे राहतील.

ठामपा/पिआरओ क्रिडा/८०७/२०२४-२५ सही/-
दि:१४.१०.२०२४ प्र. उप आयुक्त (क्रिडा)
pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेअंतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध मुख्य चौकांमध्ये आवश्यक स्थापत्य कामे करणे या एका कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र संकेतस्थळ www.mahatenders.gov.in दि. १५/१०/२०२४ ते दि. २२/१०/२०२४ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ येथे दि.२२/१०/२०२४ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदरच्या निविदा शक्य झाल्यास दि.२३/१०/२०२४ रोजी दुपारी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/८०५/२०२४-२५ सही/-
दि:१४.१०.२०२४ नगर अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

जाहिरात विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख रस्त्यावरील 3815 विद्युत खांबांवर 3 वर्ष कालावधीकरीता जाहिरात प्रदर्शन हक्क प्रदान करणेकरीताअनुभवी जाहिरातदाराकांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा प्रपत्र www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. 15/10/2024 ते दि. 04/11/2024 रोजी 16.00 वाजेपर्यंत उपलब्ध असून निविदा दि. 04/11/2024 रोजी 16.00 दुपारी वाजेपर्यंत ई-टेंडरींग पद्धतीने स्विकारण्यात येतील. निविदेचा तांत्रिक लिफाफा दि. 05/11/2024 रोजी दुपारी 16.00 वाजता अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येईल. ई-टेंडरींगबाबत अधिक माहिती हवी असल्यास ठाणे महानगरपालिकेच्या जाहिरात विभाग, पहिला मजला, पाचपाखाडी, ठाणे येथे संपर्क साधावा. कोणतेही कारण न देता निविदा नाकारणे अथवा स्विकारणेचे अधिकार ठाणे महानगरपालिकेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

ठामपा/पिआरओ/जाहिरात/८१२/२०२४-२५ सही/-
दि:१४.१०.२०२४ उपआयुक्त
pls visit our official web-site जाहिरात विभाग
www.thanecity.gov.in ठाणे महानगरपालिका,ठाणे




अ. भा. मराठी बालरंगभूमी परिषदेचा उपक्रम

# विशेष मुलांनी गाजवला ठाण्यात कला महोत्सव !

**ठाणे :** डोळ्यांच्या कडा ओल्या होण्याचे आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करून अंगातील सुप्त कलागुणांचा त्यांचा अविष्कार पाहताना मन भरून येण्याचे अनेक हृद्य क्षण रविवारी ठाण्यात झालेल्या दिव्यांग कला महोत्सवानिमित्त प्रेक्षकांना अनुभवण्यास आले.

अखिल भारतीय बालरंगभूमी परिषदेतर्फे आयोजित 'यहाँ के हम सिकंदर' या विशेष मुलांसाठी आयोजित कला महोत्सव विशेष मुलांनी गाजवला. ठाणे शाखेने येथील बाळासाहेब ठाकरे स्मारकात आयोजित केलेल्या उपक्रमात 20 दिव्यांग शाळांतील विद्यार्थ्यांनी नाच, गाणी, नाटके आदी कला सादर केल्या. सात शाळांतील मुलांनी त्यांनी बनवलेल्या वस्तूंचे स्टॉल लावून विक्री केली.

अ. भा. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा अभिनेत्री सौ. निलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते या कलामहोत्सवाचे उदघाटन झाले. 'या विशेष मुलांमधील निरागसता सर्वसामान्य माणसांना बरेच काही शिकवून जात असते. त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देऊन बालरंगभूमी परिषद त्यांना मुख्य प्रवाहात आणू पाहत आहे', असे त्या म्हणाल्या. ठाणे शाखेच्या कार्यकर्त्यांचे त्यांनी सुयोग्य आयोजनाबद्दल कौतुक केले. यावेळी केंद्रीय पदाधिकारी कार्याध्यक्ष राजू तुलालवार, वैदेही चवरे आणि नागसेन पेंढारकर उपस्थित होते.

ठाणे शाखेतर्फे स्वागत करून श्री. मिलिन्द बल्लाळ यांनी कला महोत्सवामुळे समाजातील वंचित आणि उपेक्षित वर्गाला सामावून घेण्याची संधी मिळाल्याबद्दल सौ. निलम शिर्के-सामंत यांचे आभार मानले. समाजात संवेदना जीवंत ठेवण्यासाठी ठाणे शाखा परिषदेतर्फे दिलेले सर्व उपक्रम यशस्वी करणार असल्याचे ते म्हणाले. कला महोत्सव यशस्वी करण्यासाठी मंदार टिल्लू, अमोल आपटे, मेघना साने, सुचेता रेगे, नूतन बांदेकर, दयानंद पाटील, पी. एन. पाटील, राजेश जाधव, सुनिल जोशी, स्वाती आपटे, प्रणाली गंधे आदींनी मेहनत घेतली.

कला महोत्सवात आशीर्वाद देण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ सौ. मीरा कोर्डे, चित्रकार विजयराज बोधनकर, प्रा. प्रदीप ढवळ, आर्थिक पाठबळ देणारे व्ही. चंद्रशेखरन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा कदम आणि सविता चौधरी यांनी केले.

# विनयभंग प्रकरणातील आरोपीला अटक करा-राजन विचारे

**ठाणे:** ठाण्यात सचिन यादव या एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने भंडारआळी येथील 11 वर्षाच्या चिमूरड्या मुलीवर विनयभंग केला. त्या आरोपीला जामीन कसा मंजूर होऊ शकतो असा प्रश्न उपस्थित करत त्यास अटक करावी अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीने केली आहे.

ठाणे नगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे. हा आरोपी मुख्यमंत्र्यांच्या शिवसेना गटाचा पदाधिकारी असून त्या आरोपीला सोडण्यासाठी जर राजकीय हस्तक्षेप होत असेल तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ठाणे जिल्हा महिला आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असे निवेदन देण्यात आले आहे. तसेच या आरोपीवर पोक्सो अंतर्गत अधिकाधिक कठोर गुन्हा दाखल करून त्याला पुन्हा अटक करण्यात यावी अशी मागणीही करण्यात आली आहे.

यावेळी महिला जिल्हा संघटक रेखा खोपकर, समिधा मोहिते, आकांक्षा राणे, महेश्वरी तरे, प्रमिला भांगे, वैशाली शिंदे, मंजिरी ढमाले, बिपिन गेहलोत तसेच इतर शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उल्हासनगरात बॅनर काढताना शॉक लागून तरुणाचा मृत्यू

**उल्हासनगर:** राजकीय प्रसिद्धीसाठी शहरात ठिकठिकाणी लावण्यात येणारे बॅनर नागरिकांच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरत आहेत. अशीच एका दुर्दैवी घटना घडली असून एका 25 वर्षीय तरुणाला बॅनर काढत असताना विजेचा धक्का लागून तो जागीच मृत्युमुखी पडला.

ही घटना उल्हासनगर शहरातील कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघातील श्रीराम चौक येथील असून, या दुर्घटनेमुळे स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मृत तरुणाचे नाव सोहेल भिंगारदिवे (25) असे असून, तो बॅनर काढण्यासाठी नेहमीप्रमाणे काम करत होता. बॅनरच्या लोखंडी साखळ्या आणि वायरच्या नजीकच्या संपर्कामुळे त्याला जबरदस्त शॉक लागला, ज्यामुळे त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. विशेष म्हणजे, या घटनेने राजकीय बॅनर लावण्याच्या अनियंत्रित प्रथेविरुद्ध नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपास सुरु केला आहे. स्थानिकांनी या घटनेनंतर आवाज उठवत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# कळव्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाचे लोकार्पण

**ठाणे:** कळवा येथील कावेरी सेतूवर आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक ग्रंथालय व अभ्यासिकेचे लोकार्पण सोमवारी करण्यात आले.

कळवा येथे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही प्रकारची सुविधा नव्हती. ही बाब स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या एका विद्यार्थिनीने डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी जागा मिळवून या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ही लायब्ररी सुरू केली आहे. हे ग्रंथालय-अभ्यासिका पूर्ण वातानुकूलीत असून सुमारे पाच हजारांपेक्षा अधिक पुस्तके सद्यस्थितीत येथे आहेत. येथे केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाच्या परीक्षार्थींसाठी ठामपाचे विरोधी पक्षनेते मिलींद पाटील हे मोफत पुस्तके उपलब्ध करून देणार आहेत. सकाळी सहा ते रात्रौ बारा वाजेपर्यंत ही लायब्ररी सुरु राहणार आहे.

'कळवा, खारीगाव, विटावा, पारसिक नगर, कळवा पूर्व येथील विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय-अभ्यासिका नसल्याने त्यांना अभ्यासासाठी ठाणे गाठावे लागत होते. प्रवासात वेळ जात असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत होता. त्यामुळेच आपण ग्रंथालय उभारले आहे. या दुमजली वास्तूमध्ये शेकडो विषयांवरील हजारो पुस्तके असून यूपीएससी, एमपीएससीचीही पुस्तके येथे आहेत. तसेच, याच ठिकाणी रतन टाटा ई लायब्ररी देखील लवकरच सुरु करण्यात येणार आहे", असे लोकार्पणानंतर डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.

यावेळी विरोधी पक्षनेते मिलींद पाटील, प्रमिला केणी, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, युवक अध्यक्ष विक्रम खामकर नगरसेवक महेश साळवी, नगरसेविका अपर्णा साळवी, प्रमिला केणी, वर्षा मोरे, मनिषा साळवी, आरती गायकवाड, माजी नगरसेवक सचिन म्हात्रे आदी उपस्थित होते.




**लवकरच उभारणार वारकरी भवन**

**महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या संतांच्या अभंगांचा, त्यांनी दिलेल्या शिकवणीचा प्रचार - प्रसार व्हावा, या उद्देशाने कळव्यात कावेरी सेतू समोर वारकरी भवन उभारण्यात येणार आहे. या भवनामध्ये संत साहित्य, संतांचा जीवन प्रवास, संत साहित्य यांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र दालन असणार आहे, असे डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.**

# लिनंका तांडेल यांना भारत गौरवरत्न श्री सन्मान आणि डॉक्टरेट




**ठाणे:** नवी दिल्ली येथे मानद डॉक्टरेट अवॉर्ड कौन्सिलने यशस्वी दीक्षांत समारंभ आयोजित केला ज्यात ठाणे पाचपाखाडी येथील 'ऑरा वास्तु सोल्युशन'च्या श्रीमती लिनंका तांडेल यांना भारत गौरवरत्न श्री सन्मान आणि डॉक्टरेट देऊन गौरविण्यात आले.

नवी दिल्ली येथे मानद डॉक्टरेट पुरस्कार परिषदेने शनिवारी 28 सप्टेंबर 2024 रोजी हॉटेल द अशोक डिप्लोमॅटिक एन्क्लेव्ह, चाणक्यपुरी, नवी दिल्ली येथे आपल्या प्रतिष्ठित दीक्षांत समारंभाचे यशस्वी आयोजन केले.

या मेळाव्यात समाज, ऊर्जा, आरोग्य, निसर्ग आणि उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल विविध क्षेत्रात असामान्य योगदान देणाऱ्या व्यक्तींना डॉक्टरेट आणि भारत गौरवरत्न श्री सन्मान देऊन गौरविण्यात आले. या प्रतिष्ठित सन्मान सोहळ्यात ज्या प्रमुख व्यक्तींचा सन्मान करण्यात आला त्यात भारताचे माजी वस्त्रोद्योग मंत्री आणि खासदार सय्यद शाहनवाज हुसेन, बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी कुंद्रा आणि इतर मान्यवरांचा समावेश होता. या यशस्वी दीक्षांत समारंभाबद्दल डॉक्टरेट पुरस्कार परिषदेचे अध्यक्ष तपनकुमार राऊत राय यांनी भारत गौरवरत्न श्री सन्मान आणि डॉक्टरेट पदवीने सन्मानित केले.






# लायन्स क्लब ऑफ ठाणे कोपरीच्या मेडिकल सेंटरमार्फत मोफत सेवा

**ठाणे :** लायन्स क्लब ऑफ ठाणे कोपरी या सामाजिक संस्थेने 10 मे 2024 रोजी डायबेटीस व मेडिकल सेंटर डी 4/101 म्हाडा कॉलनी, वसंत विहार, ठाणे येथे सुरु केले आहे.

या सेंटरतर्फे डायबेटिसच्या (आरबीएस) शुगर चाचणी, डॉक्टरांचा सल्ला, एचबी ए, सी चाचणी (ग्लायकोसलेटेड हिमोग्लोबिन टेस्ट) या मोफत केल्या जातात. तसेच सर्व प्रकारच्या रक्त चाचण्या व इतर डॉक्टरांच्या सेवा अतिशय अल्प दरात उपलब्ध आहेत. सेंटरतर्फे मोफत डायबेटीस शिबिरे विविध ठिकाणी आयोजित केली जातात.

नुकत्याच झालेल्या ऑक्टोबर सेवा सप्ताहामध्ये (गांधीजयंती निमित्त) सेंटरने 16 मोफत डायबेटीस शिबिरे ठाण्यातील विविध ठिकाणी आयोजित केली होती. यामध्ये 1075 लोकांची शुगर चाचणी, 350 नागरीकांची सहाशे रुपयांची एचबी ए, सी चाचणी मोफत करण्यात आली.

गृहसंकुलामध्ये नागरिकांसाठी मोफत डायबेटीस शिबीर आयोजित करावयाचे असेल तर लायन्स क्लब ठाणे कोपरी येथील डायबेटीस सेंटरच्या अध्यक्षा लायन अनघा गांधी यांच्याशी 9819070166 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन लायन्स क्लब ठाणे कोपरीच्या अध्यक्षा लायन सोनल कद्रेकर व डायबेटीस सेंटरचे मुख्य प्रशासक व ट्रस्टी लायन बाबुराव पिसाळ यांनी केले आहे.

# दिवा शहराचा कायापालट करणार-सुभाष भोईर

**ठाणे:** कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचा आमदार असताना सर्वात जास्त आमदार निधी दिवा शहराला दिला होता. मागील पाच वर्षे दिवा शहराचा विकास रखडला परंतु येत्या काळात ठाणे महानगरपालिका व शासनाच्या माध्यमातून दिवा शहरासाठी भरघोस निधी प्राप्त करून देण्यासाठी पुढाकार घेऊन दिवा शहराचा कायापालट करणार असल्याचे माजी आमदार सुभाष भोईर यांनी सांगितले.




चंद्रांगण रेसिडेन्सीसमोर मुख्य रस्त्यावर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचते. त्याचा मुख्य रस्त्यावरुन ये-जा करण्याऱ्या तसेच चंद्रागण सोसायटी व परिसरातील सोसायटीमध्ये वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. त्यासाठी व्यापारी तसेच नागरिकांनी माजी आमदार सुभाष भोईर यांच्याकडे आरसीसी गटर करण्याची मागणी केली होती. त्या ठिकाणी आरसीसी गटर बांधण्यासाठी माजी आमदार सुभाष भोईर यांनी तत्कालीन महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे पाठपुरावा करीत असताना त्यांनी त्वरित अहवाल सादर करण्यास सांगितले व विद्यमान आयुक्त सौरभ राव यांनी सदर प्रस्ताव मंजूर करून 55 लक्ष रुपये निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे प्रेरणा टॉवर ते ट्रान्सफॉर्मर आरसीसी गटर काढण्याचा मार्ग मोकळा झाला.

या भूमिपूजन प्रसंगी दिवा गावचा भूमिपुत्र म्हणून दिवा शहरातील विविध समस्या सोडविण्यासाठी कायम अग्रभागी असल्याचे सांगून दिवा शहराच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

या भूमिपूजन प्रसंगी दिवा शहरप्रमुख सचिन पाटील, शहर संघटिका ज्योती राजकांत पाटील, व्यापारी संघटना अध्यक्ष चेतन पाटील, उद्योजक अनिल भगत, युवा सेना उपजिल्हा अधिकारी स्वप्रिल पावशे, युवा सेना शहर अधिकारी अभिषेक ठाकूर, उप विधानसभा अधिकारी जितु पाटील, उप शहर संघटक प्रविण उतेकर, विभाग प्रमुख वैकुंठ म्हात्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नवीन विकास आराखडा विकासकांच्या फायद्यासाठी -विक्रांत चव्हाण

**ठाणे:** शहराच्या विकासाची दिशा ठरविणारा ठाणे शहराचा विकास आराखडा घाईघाईत ठाणे महापालिका प्रशासनाने जाहीर केला आहे. विकासकांच्या फायद्यासाठी असलेला व आगामी निवडणुकीसाठी एका राजकीय पक्षाला फंडींग मिळवून देण्यासाठी हा विकास आराखडा राबविला जात असल्याचा आरोप ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

अडीच वर्षांचा काळ उलटून गेला असून ठाणे महापालिकेचे सभागृह अद्याप अस्तित्वात नाही. आता विधानसभेचे बिगुल वाजणार आहे. त्याआधीच काही दिवसांपूर्वी ठाणे महापालिका प्रशासनाने शहर विकास आराखडा गुपचूप जाहीर केला आहे. शहराच्या विकासात लोकप्रतिनिधी आणि नगरसेवकांचे महत्वाचे योगदान असते. विकासाच्या मुद्यावर लोकप्रतिनीधी आवाज उठवत असतात. सभागृह अस्तित्व नसताना लोकप्रतिनिधींना पालिका प्रशासनाने विश्वासात घेऊन विकास आराखडा जाहीर करायला हवा होता असे मत विक्रांत चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत मांडले. विधानसभा तोंडावर असताना राजकीय पक्षांना निवडणूक निधीची गरज असते. शहर विकास आराखडा विकासकांच्या मर्जीनुसार बनवून एका राजकीय पक्षाला याच्या माध्यमातून निवडणूक निधी उभारला जात असल्याचा आरोप विक्रांत चव्हाण यांनी केला आहे.






# टीडीआरएफचे जवान होणार कायम

**ठाणे:** ठाण्यातच नव्हे तर जिल्ह्यात आणि राज्यात कुठेही आपत्तीची परिस्थिती उद्भवल्यास आपला जीव धोक्यात घालून शेकडो जीव वाचवणारे ठाणे महापालिकेचे टीडीआरएफ पथकातील 31 जवानांचे कायम नोकरीचे स्वप्न अखेर साकार झाले आहे.

राज्य शासनाने पालिकेच्या अस्थापनेत या जवानांना विशेष बाब म्हणून कायम करण्याचा प्रस्ताव मंजूर केला असून तसा आदेश पारित केला आहे. त्यामुळे तुटपुंज्या पगारावर कर्तव्य बजावणाऱ्या या जवानांना आता आस्थापनेच्या नियमानुसार वेतन मिळणार आहे. या पथकाला मानधनाच्या नावावर सध्या 20 हजार रुपये दर महिन्याला हातात येतात. अत्यंत तुटपुंज्या मानधनावर हे जवान आपल्या जीवाची बाजी लावत असल्याने त्यांना पालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी घेण्यात यावे, अशी मागणी जोर धरत होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या जवानांना कायम करण्याचे आश्वासन दिले होते.


## आमचे नेत्रालय

**माझे वय ६७ वर्षे असून फेब्रुवारी २०२३ मध्ये मोतीबिंदू झाल्याचे निदान झाले. त्यामुळे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी माझ्या मुलाच्या मदतीने मी श्री रामकृष्ण नेत्रालय बद्दल माहिती मिळवली. येथे भेट दिल्यावर विश्वास वाटला आणि खात्री पटली म्हणून मी येथेच शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. येथील डॉक्टर तज्ज्ञ असून संपूर्ण स्टाफ सहकार्य करणारा आहे. त्यामुळे शस्त्रक्रिया उत्तम प्रकारे होऊ शकली. अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध असल्याने कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाही. डॉ. नितीन देशपांडे आणि डॉ. प्राजक्ता यांच्यामुळे योग्य मार्गदर्शन आणि उपचार मिळाले. त्यामुळे मी इतरांना देखील डोळ्यांच्या उपचारासाठी येथे येण्यासाठी आग्रह धरते, असे सुनंदा जयंत गोळे सांगतात.**



सुनंदा जयंत गोळे

Shree Ramkrishna Netralaya
Super Speciality Eye Care

**श्री रामकृष्ण नेत्रालय :** घोडबंदर रोड | मखमली तलाव | मुलुंड | वाशी | सी वूड्स
संपर्क - ७५०६०६६७६९ | ई-मेल: info@shreeramkrishnanetralaya.com,
https://www.shreeramkrishnanetralaya.com/